शनिवार, २६ फेब्रुवारी २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २२०
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड




बँकॉक : युरोपियन इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, पॅरीस, फ्रान्स यांच्या वतीने सामाजिक कार्याबद्दल ज्येष्ठ निरुपणकार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना लिव्हिंग लेजंड अॅवॉर्डने गौरविण्यात आले. यासोबतच सचिनदादा धर्माधिकारी यांना मानद डॉक्टरेट ही पदवी बहाल करण्यात आली. (वृत्त पान ५ वर..)

## युक्रेनमधील २० हजार भारतीयांना परत आणण्यासाठी

# भारत सरकारचे मोठे पाऊल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर तिथे अडकलेल्या परदेशी नागरिकांना मोठ्या त्रासाचा सामना करावा लागत आहे. भारतातील हजारो विद्यार्थी आणि इतर लोक तिथे अडकले आहेत. त्यांना परत आणण्यासाठी आता भारत सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. सरकार विशेष उड्डाणे चालवणार असून, त्याचा सर्व खर्च भारत सरकार स्वतः उचलणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भारतातील सुमारे २० हजार नागरिक युक्रेनमध्ये अडकले आहेत. यापैकी १८ हजार विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी गेले आहेत. रशिया-युक्रेनमध्ये लष्करी तणाव सुरू झाल्यानंतर तेथील विद्यार्थी भीतीच्या छायेखाली जगत आहेत. सोशल मीडियावर वारंवार व्हिडिओ शेअर करुन ते भारत सरकारकडे परत आणण्याची विनंती करत आहेत.

विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, रशियाने हल्ला केल्यानंतर युक्रेनमधील परिस्थिती झपाट्याने बिघडली आहे. खाद्यपदार्थांचा तुटवडा सुरू असून, एटीएम मशीनमध्येही पैसे मिळत नाहीये. अनेक ठिकाणी चेंगराचेंगरीचे वातावरण तयार होत आहे. युक्रेनची राजधानी कीव्हवर रशियन क्षेपणास्त्रे आणि बॉम्ब पडल्याने विद्यार्थ्यांमध्ये घबराट वाढली आहे. त्यांच्या पालकांनीही सरकारला त्यांच्या मुलांना युक्रेनमधून बाहेर काढण्याची विनंती केली आहे.

या विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना आधी शेजारील पोलंड आणि हंगेरी येथे आणले जाईल आणि नंतर विमानाने त्यांना मायदेशी परतले जाईल. यासाठी सरकारने युक्रेन, हंगेरी, पोलंडसह सर्व संबंधित सरकारांकडून सहकार्य मागितले आहे. लवकरच ही मोहीम सुरू होणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

### रशियाचे एक हजार सैनिक ठार : युक्रेनचा दावा

**कीव्ह :** बलाढ्य रशियाशी युक्रेनचे सैन्य नेटाने आणि गनिमी काव्याने लढा देत असून रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांना हादरा देणारी माहिती आता समोर आली आहे. युक्रेनच्या प्रतिहल्ल्यात रशियाचे एक हजारपेक्षा जास्त सैनिक ठार झाले आहेत, असा दावा युक्रेनच्या संरक्षण मंत्रालयाकडून करण्यात आला आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यात युद्ध भडकले आहे. रशियन सैन्याने युक्रेनमध्ये घुसून हल्ल्या केल्यानंतर अनेक शहरांना युद्धभूमीचे स्वरूप आले आहे. रशियन फौजा राजधानी कीव्ह शहरापर्यंत पोहचल्या असून या शहरावर कब्जा मिळवण्याचे रशियाचे मनसुबे उधळण्यासाठी युक्रेनी सैनिक प्राणपणाने लढत आहेत. कीव्ह शहर हाय अलर्टवर आहे. शहरात सायरनचे आवाज ऐकू येत आहेत. कोणत्याही क्षणी मोठा हल्ला होण्याची भीती आहे. त्यामुळेच नागरिकांनाही सतर्क करण्यात आले आहे. कीव्हमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रपुरवठा करण्यात आला असून स्वसंरक्षणासाठी नागरिकांना शस्त्रे वाटण्यात आली असल्याचे वृत्त आहे.

### रायगडातील २५ विद्यार्थी अडकले

**अलिबाग :** भारतातील हजारो विद्यार्थी शिकण्यासाठी युक्रेनमध्ये गेलेले आहेत. त्यामुळे भारत सरकारच्या वतीने प्रत्येक राज्यातील जिल्हा प्रशासनाला विद्यार्थ्यांची माहिती घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार आतापर्यंत हाती आलेल्या माहितीनूसार युक्रेनमध्ये रायगड जिल्ह्यातील २५ विद्यार्थी अडकल्याची माहिती पालकांनी जिल्हा प्रशासनाला कळवली आहे. या विद्यार्थ्यांना मायदेशी परत आणण्यासाठी जिल्हा प्रशासन परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधून प्रयत्न करीत आहे. **(सविस्तर वृत्त पान ५ वर)**

### एअर इंडियाची दोन विमाने आज रवाना

**नवी दिल्ली :** रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू झालेल्या युद्धामुळे युक्रेनमध्ये अडकलेल्या हजारो भारतीयांसाठी आनंदाची बातमी आहे. या लोकांच्या सुटकेसाठी भारत सरकारने एअर इंडियाची दोन विमाने पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. ही दोन्ही विमाने शनिवारी पहाटे दोन वाजता उड्डाण करण्यास सुरुवात करतील. ही विमाने रोमानियाची राजधानी बुखारेस्ट मार्गे लोकांना एअरलिफ्ट करणार आहेत.

आधीच भारतीय बचाव पथके रोमानियाच्या सीमेवर पोहोचली आहेत, तेथून युक्रेनची राजधानी कीव्ह येथे फक्त १२ तासांच्या ड्रायव्हिंगने पोहोचता येते. बचाव पथक भारतीय लोकांना बुखारेस्टला आणणार आहे. त्यानंतर भारतीय नागरिकांसाठी सुरक्षितपणे मायदेशी परतण्यासाठी बुखारेस्ट येथून विशेष विमाने असणार आहेत.

दरम्यान, शुक्रवारी अनेक भारतीय नागरिकांनी कीव्हमधील भारतीय दूतावासात आश्रय घेतला. दूतावासाच्या परिसरात गोळीबार झाल्याचेही वृत्त आहे, मात्र कोणतीही जीवितहानी झालेली नाही. भारतीय दूतावासाने भारतीय लोकांना शांत राहण्याचे आवाहन केले आहे. त्यांना लवकरच पर्यायी मार्गाने बाहेर काढण्याची योजना आखली जात असल्याचे सांगण्यात येत आहे.

### सभागृह नेता चषक २०२२



पनवेल : आदेश स्पोर्ट्सच्या वतीने शिवाजीनगर येथे सभागृह नेता चषक २०२२ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदानात ही स्पर्धा खेळली जात आहे. या स्पर्धेचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. या वेळी शिवाजीनगर अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, पी. के. ठाकूर, व्हि. के. ठाकूर, भाजप महिला मोर्चा अध्यक्ष रत्नप्रभा घरत, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, टी. के. ठाकूर, सुधीर ठाकूर, अनंता ठाकूर, वसंत ठाकूर, शनिदास ठाकूर, उलवे नोड २ अध्यक्ष योगिता भगत, सदस्या कामिनी कोळी, उषा देशमुख, किशोर पाटील, आर. के. भगत, भाऊ भोईर, पंढरीनाथ भगत, दामोदर भगत, शशिकांत ठाकूर, शिरिष कडू, आशिष घरत आदी उपस्थित होते.

### एसटी विलीनीकरणाबाबत पुढील सुनावणी ११ मार्चला

**मुंबई : प्रतिनिधी**



एसटी महामंडळाच्या विलीनीकरणाच्या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयात शुक्रवारीही (दि. २५) निर्णय होऊ शकलेला नाही. तीन सदस्यीय समितीच्या अहवालाला मंत्रिमंडळाची संमती घ्यावी लागणार असल्याची माहिती विशेष सरकारी वकिलांना न्यायालयाला सांगितल्यानंतर राज्य मंत्रिमंडळाने या अहवालासंदर्भात निर्णय घेण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. आता पुढील सुनावणी येत्या ११ मार्च रोजी होणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयात शुक्रवारी सुनावणी सुरू झाल्यानंतर विशेष सरकारी वकिलांनी न्यायालयाला अहवालाबाबत माहिती दिली. तीन सदस्यीय समितीच्या अहवालाची प्रत आम्ही एसटी महामंडळ आणि संपकरी कर्मचाऱ्यांच्या वकिलांना दिलेली नाही, अशी माहिती वकिलांनी न्यायालयाला दिली. याचे कारण त्याला आधी राज्य मंत्रीमंडळाची संमती घ्यायची आहे, असे विशेष सरकारी वकिलांनी सांगितले.

दरम्यान, एसटी महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलीनिकरण करण्याबाबत समितीने दिलेला अहवाल सार्वजनिक करता येणार नाही, अशी माहिती शुक्रवारी राज्य सरकारने कोर्टाला दिली आहे.

## निवडक

### पोलिसांच्या पदोन्नतीबाबत शासन निर्णय जारी

**मुंबई :** पोलीस दलासाठी मागील वर्षी दसऱ्याच्या मुहूर्तावर राज्य सरकारने पोलिसांच्या पदोन्नतीबाबत निर्णय घेतला होता, मात्र शुक्रवारी (दि. २५) त्याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. तशी माहिती गृहमंत्रालयाने दिलीय. या निर्णयाने राज्यातील हजारो पोलीस हवालदारांचे पोलीस उपनिरीक्षक होण्याचे स्वप्न पूर्ण होणार असल्याची माहिती गृहमंत्र्यालयाकडून देण्यात आली.

### ‘लष्कर-ए-तैयबा’च्या दहशतवाद्यांचा खात्मा

**श्रीनगर :** दक्षिण काश्मीरमधील शोपियान जिल्ह्यातील अमशीपोरा गावात शुक्रवारी सकाळी सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत लष्कर-ए-तैयबाचे दोन दहशतवादी ठार झाले. ज्या ठिकाणी चकमक झाली त्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारूगोळा आणि काही आक्षेपार्ह साहित्य देखील जप्त करण्यात आले आहे. ठार झालेले दोन्ही दहशतवादी स्थानिक असल्याचे सांगण्यात येत असून त्यांची ओळख मुझमिल आणि आबिद, असे समजत आहे.

### पनवेल महापालिका मुख्यालयाच्या इमारत बांधकामास ‘स्थायी’ची मंजुरी



या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका मुख्यालयाच्या इमारतीचे बांधकाम करण्यास स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. महानगरपालिकेची स्थायी समितीची ऑनलाइन सभा शुक्रवारी (दि. २५) मुख्यालयातील आयुक्त दालनासमोरील सभागृहात स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची बाह्य यंत्रणेद्वारे सशुल्क कचरा उचलुन विल्हेवाट लावण्याबाबतचा विषय आजच्या बैठकित मंजूर करण्यात आला. महापालिका क्षेत्रात सार्वजनिक शौचालय, स्वच्छतागृहांची अत्याधुनिक तंत्राचा वापर करून निर्जंतुकीकरण करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजुरी दिली. पनवेल व्यवसाय, हॉटेल परवाने नवीन कारखाने उद्योगधंदे सर्वेक्षण, नोंदणीकरण नुतनीकरण, दुकानावरील जाहिराती व परवाना संबंधीच्या अनुषंगिक काम स्वारस्य अभिव्यक्ती पध्दतीने करण्याचा विषय स्थायी समितीने मंजुरी दिली. **(पान २ वर..)**

### नवी मुंबईत प्रियकराने केली प्रेयसीची हत्या

**आरोपी अटकेत**

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील तुर्भे येथील साई प्रणव लॉजवर एक प्रेमी जोडपे आले होते. रात्रभर त्यांची कडाक्याची भांडणे सुरू होती. एपीएमसी पोलीस घटनास्थळी आले असता त्यांना लॉजमधील रूममध्ये तरूणी बेशुद्ध अवस्थेत आढळली. तरूणीला तत्काळ रूग्णालयात दाखल केले असता तिचा मृत्यू झाल्याचे समोर आले. दरम्यान, तिच्यासोबत आलेल्या तरुणाला पळून जात असताना पोलिसांनी ताब्यात घेतले आणि चौकशी केली असता, आपणच तिचा गळा आवळून खून केल्याचे त्याने कबूल त्याने केले.

खडकपाडा कल्याण येथे वास्तव्यास असणारा हा तरुण या महिलेसोबत मागील पाच वर्षांपासून प्रेमसंबंधात होता आणि ही तरुणी लग्नसाठी त्याच्या मागे लागली होती, मात्र लग्न करण्याची इच्छा नसल्याने आरोपी तरुणाने तिची हत्या केली. अशी माहिती समोर आली आहे.

याप्रकरणी आरोपीस पाच दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पुढील तपास एपीएमसी पोलीस करत आहेत. अशी माहिती पोलीस उपायुक्त विवेक पानसरे यांनी दिली.



### पनवेलमधील गटारांच्या कामांना सुरुवात

**सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून आढावा**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९ मध्ये ठिकठिकाणी असलेल्या गटारांमध्ये पाणी साचण्याची समस्या तसेच रस्त्याची समस्या नागरिकांना भेडसावत होती. त्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या समस्यांची पाहणी केली होती. त्यानुसार या कामांना सुरुवात झाली असून, त्याचा आढावा परेश ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. २५) घेतला तसेच मिडल क्लास हौसिंग सोसायटीमधील रस्ते आणि गटारांची पाहणी केली.

सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या माध्यमातून नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून त्या सोडवण्याचे काम सुरू आहे. त्यानुसार प्रभाग क्रमांक १९ मधील एसटी स्टँड परिसरातील गटारांची पाहणी केली होती. या कामांना सुरुवात झाली असून, परेश ठाकूर यांनी या कामाची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या तसेच मिडल क्लास हौसिंग सोसायटीमधील रस्ते आणि गटाराची अधिकाऱ्यांसोबत पाहणी केली. या वेळी प्रभाग समिती ‘ड’च्या सभापती अॅड. वृषाली वाघमारे, नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, प्रभाग क्रमांक १९ अध्यक्ष पवन सोनी, शैलेश गायकवाड, संजय जाधव आदी उपस्थित होते.

### ‘सीकेटी’ आणि ‘कोमसाप’तर्फे आज मराठी भाषा दिन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि कोकण मराठी साहित्य परिषद, (कोमसाप) नवीन पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २६) दुपारी १२ वाजता चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा दिन साजरा होणार आहे.

मराठी भाषेच्या जडणघडणीत प्रसिध्द साहित्यिक कुसुमाग्रज अर्थात वि. वा. शिरवाडकर यांचा सिंहाचा वाटा आहे. कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी म्हणजेच २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिन साजरा केला जातो. या दिवशी महाराष्ट्रात विविध साहित्यिक, शैक्षणिक संस्थांच्या वतीने शैक्षणिक, भाषिक, सांस्कृतिक आदी कार्यक्रम-उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्या अनुषंगाने कोकण मराठी साहित्य परिषद, नवीन पनवेल शाखा तसेच चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा दिन साजरा होणार आहे.

हा कार्यक्रम चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या इंदुमती घरत, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांच्या उपस्थितीत शनिवारी मराठी भाषा दिन साजरा होणार आहे.

### स्व. लता मंगेशकर यांच्या सुरेल आठवणींना उजाळा

**‘मेरी आवाज ही पहचान है’मध्ये अनोखी आदरांजली**

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

(छाया : लक्ष्मण ठाकूर)




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न लता मंगेशकर यांच्या सुरेल आठवणींना उजाळा देण्यासाठी पनवेलमध्ये गुरुवारी (दि. २४) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ‘मेरी आवाज ही पहचान है’ या सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम सादर झाला. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा यांच्यासह अनेक संस्थांच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या वेळी उपस्थित मान्यवरांनी लता मंगेशकर यांना आदरांजली वाहिली.

भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फटके नाट्यगृहात सुरेल गायणाच्या कार्यक्रमाद्वारे आदरांजली वाहण्यात आली. नाट्यगृहात मेरी आवाज हि पहचान है या सुमधुर गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा, भारत विकास परिषद, **(पान २ वर..)**

# महाविकास आघाडीतील घटक पक्षांत दूरावा

## राष्ट्रवादीच्या आंदोलनात शिवसेनेची गैरहजेरी

**ठाणे : प्रतिनिधी**

केंद्रीय तपास यंत्रणेचा गैरवापर करून राजकीय फायदा उठवित असल्याचा आरोप करत महाविकास आघाडीच्या वतीने शुक्रवारी (दि. २५) ठाण्यात आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते, परंतु महाविकास आघाडीचा घटक असलेल्या शिवसेनेचा एकही पदाधिकारी आणि कार्यकर्ता आंदोलनात सहभागी झालेला नव्हता. शिवसेनेच्या गैरहजेरीमुळे महाविकास आघाडीत सारे काही अलबेल नसल्याची चर्चा आहे.

ठाणे महापालिकेच्या निवडणुका येत्या काही महिन्यात होणार आहेत. या निवडणुकांच्या तोंडावर मिळेल त्या मुद्द्यावरून शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांमध्ये चिखलफेक सुरू होती. हा वाद दिवसेंदिवस वाढू लागला होता. हा वाद आणखी चिघळू नये म्हणून राष्ट्रवादीचे नेते आणि गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड आणि शिवसेना नेते व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी संयमाचा सूर आवळले होते. असे असतानाच शुक्रवारी महाविकास आघाडीने पुकारलेल्या आंदोलनात शिवसेनेचा नेते आणि कार्यकर्ते उपस्थित नव्हते.




मंत्री नवाब मलिक यांना समर्थन देण्यासाठी महाविकास आघाडीच्या वतीने शुक्रवारी ठाण्यात आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला राष्ट्रवादीचे ठाणे शहराध्यक्ष आनंद परांजपे, महापालिकेतील राष्ट्रवादीचे गटनेते नजीब मुल्ला आणि काँग्रेसचे शहराध्यक्ष विक्रांत चव्हाण यांच्यासह काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनात केंद्र सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनात शिवसेनेचा एकही पदाधिकारी आणि कार्यकर्ता हजर नव्हता. यामुळे ठाण्याच्या महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे अद्याप मनोमिलन झालेले नसल्याचे दिसून येते. या संदर्भात शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख व महापौर नरेश म्हस्के यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

दरम्यान, औरंगाबाद, नांदेड येथेही महाविकास आघाडीकडून धरणे आंदोलन करण्यात आले. या वेळी आंदोलनात शिवसेनेचे मोजके नेते आणि पदाधिकारी सोडले तर इतर कार्यकर्त्यांनी मात्र आंदोलनातून कल्टी मारल्याचे पाहायला मिळाले. काँग्रेस-राष्ट्रवादीचे झेंडे पाहायला मिळाले. पण शिवसेनेचा ना झेंडे होते ना कार्यकर्त्यांची गर्दी होती.

# कामोठे भाजपतर्फे मोफत ई-श्रम महानोंदणी अभियान

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी भाजप कामोठे मंडळाच्या वतीने दोन दिवसीय मोफत ई-श्रम महानोंदणी अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानास शुक्रवार (दि. २५)पासून भाजपच्या कामोठे येथील कार्यालयात राबवण्यात येत आहे.

या वेळी भाजपचे कमोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, नगरसेवक विजय चिपळेकर विकास घरत, युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, महिला मोर्चा अध्यक्षा वनिता पाटील, युवा नेते हॅप्पी सिंग, साधना आचार्य, हरिश्री भारद्वाज, भटके विमुक्त आघाडीच्या जिल्हाध्यक्षा विद्या तामखेडे, महादेव पाटील, प्रवीण कोरडे, संदीप तुपे, सुनीता शर्मा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.





## कामोठ्यातील पारधी समाजाच्या नागरिकांसाठी आधार व रेशन कार्ड शिबिर

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

पारधी समाजाला प्रवाहात आणण्याचा भाजप भटके विमुक्त जमाती महिला सेलच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष विद्या तामखडे यांचा प्रयत्न सुरू आहे. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी कामोठे परिसरातील या बांधवांच्या पालावर जाऊन तिथल्या अडचणींची चर्चा केली होती.

मूळच्या जत तालुक्यातील असलेल्या या समाजाकडे आधार कार्ड नसल्याने अन रेशन कार्ड नाही म्हणून रेशनच्या शिध्यापासून वंचित राहिलेले आहेत. त्यांना तत्काळ आधार आणि रेशन कार्ड देण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांना कल्पना विद्या तामखडे यांनी दिली. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्या प्रक्रियेला सुरू झाली. या वेळी फॉर्म भरून देण्यात आले. विद्या तामखडेंसह जनसंपर्क अधिकारी अमित रोकडे, कर्मचारी वर्ग सुभाष कांबळे, मनस्वी पारकर आणि सामाजिक कार्यकर्ते सागर पाटील आदी या वेळी उपस्थित होते.



**उरण : ओएनजीसी उरण प्लान्ट व पेट्रोलीयम एम्प्लॉईज युनियन उरण यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी द्रोणागिरी भवन येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला आमदार महेश बालदी यांची उपस्थिती लाभली. दरम्यान, ७०२ रक्तदात्यांनी शिबिरात रक्तदान केले.**






**उरण : उरण समाचार साप्ताहिकाचे संस्थापक संपादक पत्रकार स्वर्गीय अतुल पाटील यांच्या जयंतीनिमित्त चिरनेर येथील अणु-प्राथमिक आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना स्नेह भोजनाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात अतुल पाटील यांना आदरांजली वाहण्यात आली. या वेळी अतुल पाटील यांच्या पत्नी मनिषा पाटील, मुलगा आशिष पाटील, मुलगी दीपिका पाटील, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप पाटील, रमेश थळी आणि आशिष सर्व्हिस सेंटरचे कर्मचारी उपस्थित होते.**

## पोस्ट ऑफिस १०० टक्के कोअर बँकींग प्रणालीवर होणार उपलब्ध

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पोस्टाच्या पारंपारिक सेवांच्या सोबत राष्ट्रीयकृत बँकांच्या सर्व काऊंटर सेवा विविध योजना अशा अनेक सुविधांमुळे आता टपालखात्याचे स्वरुप आधुनिक बँकांसारखे झाले आहे. सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात झालेल्या घोषणेनुसार चालू वर्षात एक लाख ५० हजार पोस्ट ऑफिस १०० टक्के कोअर बँकींग प्रणालीवर उपलब्ध होतील, असे भारतीय पोस्ट विभागाने कळविले आहे.

चालू वर्षात एक लाख ५० हजार पोस्ट ऑफिस १०० टक्के कोअर बँकींग प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या सुविधेमुळे आर्थिक व्यवहार अधिक सुलभतेने करणे शक्य होईल, असे वाशी नवी मुंबई पोस्ट विभागाचे वरिष्ठ अधीक्षक यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

**डाक पेन्शन अदालतीसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन**

टपाल विभागाच्या निवृत्ती वेतन व कुटूंब निवृत्ती वेतन घेणाऱ्या व्यक्तींनी मार्च महिन्यात होणाऱ्या डाक पेन्शन अदालतीसाठी आवश्यक विहित नमुन्यातील अर्ज २८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत नवी मुंबई विभागाच्या पनवेल कार्यालयात सादर करावेत. या तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा पेन्शन अदालतीमध्ये अंतर्भाव केला जाणार नाही, असे भारतीय पोस्ट विभागाद्वारे कळविण्यात आले आहे.

# सीकेटी विद्यालयात परितोषिक वितरण सोहळा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ चा परितोषिक वितरण सोहळा शुक्रवारी (दि. २५) झाला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या संचालिका आणि सदस्य शाळा समिती अर्चना परेश ठाकूर, माजी विद्यार्थीनी प्रियंका पुरोहित (सी.ए), संतोष देशमुख (जॉईट सेक्रेटरी पालक शिक्षक समिती) तसेच चांगू काना ठाकूर विद्यालयातील विविध शाखा प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पूजनाने झाली. यानंतर स्वर म्हात्रे या विद्यार्थ्याने सुमधुर गणेश स्तवन सादर केले. विद्यालयाच्या वार्षिक प्रगतीचा आढावा घेणाऱ्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले. मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी या वेळी वार्षिक प्रगतीचा आढावा घेत प्रास्ताविक केले. यानंतर संपूर्ण वर्षभरात कोरोना काळातही यशस्वीरित्या घेण्यात आलेल्या विविध ऑनलाइन स्पर्धांचा परितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाला.

शिवजयंतीनिमित्त आयोजित केलेल्या राज्यस्तरीय मराठी भाषण स्पर्धेतील द्वितीय क्रमांक विजेती अक्षया वर्तक हिने न्यायप्रिय, प्रजाहितदक्ष छत्रपती शिवाजी महाराज या विषयावरील आपले अभ्यासपूर्ण विचार व्यक्त करून उपस्थितांची मने जिंकली.

प्रमुख पाहुण्या अर्चना ठाकूर यांनी कोरोना काळातही विद्यालयाने उत्कृष्टपणे कामकाज केल्याबद्दल मुख्याध्यापक संतोष चव्हाण, सुपरवायजर नीरजा मॅडम आणि सर्व शिक्षक यांची प्रशंसा करून अभिनंदन केले. माजी विद्यार्थीनी प्रियंका पुरोहित हीने नुकतीचे सीएची परिक्षा उत्तीर्ण केली. तिने आपल्या मनोगतामध्ये गोष्टीस्वरूपात विद्यार्थ्यांना येईल त्या परिस्थितीला समोरे जा असा संदेश दिला. सगळ्यांना मान द्या तरच स्वतःला सन्मान मिळेल असेही सांगितले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे.


## पनवेल मनपाची अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका क्षेत्रातील अनधिकृत होर्डिंग्जवरती कारवाई करण्याचे आदेश गणेश देशमुख यांनी संबधितांना दिले आहेत. त्याप्रमाणे पनवेल महापालिकेच्या चारही प्रभागामध्ये अनधिकृत होर्डिंग्जवरती महापालिकेची कारवाई करण्यात येत आहे.

मागील महासभेमध्ये जाहिरत धोरण जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार चारही प्रभागांमधील अनधिकृत होर्डिंग्जची यादी तयार करण्यात आली असून त्यानूसार कारवाई करण्यास सुरूवात झाली आहे. खारघर, तळोजा-पाचनंद, तळोजा येथील पेठाली येथील अनधिकृत होर्डिंग्जवरती कारवाई करण्यात आली. होर्डिंग्ज लावण्यापूर्वी जाहीरादाराने रितसर पालिकेची परवानगी घेणे गरजेचे असल्याचे उपायुक्त कैलास गावडे यांनी सांगितले आहे.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी




**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शनिवार, दि. २६ फेब्रुवारी २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर ■ ७. सेंट्रल रेल्वे, पनवेल

**कोव्हॅक्सिन**

- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ९. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- १०. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- ११. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- १२. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
- १३. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**


## पान १ वरून

### पनवेल महापालिका मुख्यालाच्या इमारत बांधकामास 'स्थायी'ची मंजुरी

पनवेल महापालिका क्षेत्रात एस. टी.स्टॅडजवळ अमृत योजनेंतर्गत मायक्रोन टनेंलिगद्वारे १००० मिमी व्यासाची केसींग पाईप्स व ४०० मिमी व्यासाची कॅरींग पाईप टाकण्याच्या विषयास मंजूरी देण्यात आली. पनवेल महानगरपालिकेकरिता स्वच्छ भारत मिशन (नागरी) अंतर्गत प्रोजेक्ट इप्लिमिमिंटेशन युनिट तयार करण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आपत्कालीन परिस्थितीत व नियमित वार्षिक नाले साफसफाई करणेकामी प्राप्त झालेल्या न्यूनतम दरास मान्यता मिळण्याच्या विषयास स्थायी समितीने मंजूरी दिली.

### स्व. लता मंगेशकर यांच्या सुरेल आठवणींना उजाळा

रंगनिल संस्था, रंगरचना कलामंच, संस्कार भारती पनवेल समिती आणि पनवेल कल्चरल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रमाचे आयोजित केला होता.

या कार्यक्रमाला उपमहापौर सीताताई पाटील, प्रभाग समिती 'ड'च्या सभापती ॲड. वृषाली वाघमारे, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक अनिल भगत, विजय चिपळेकर, विकास घरत, नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, रूचिता लोंढे, सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, महिला मोर्चा शहर अध्यक्षा वर्षा नाईक, कार्यवाहक श्यामनाथ फुंडे, युवा मोर्चा शहर अध्यक्ष रोहित जगताप यांच्यासह पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

## दुखवटा

### दशरथ देशमुख

**गव्हाण :** गव्हाण-कोपर गावचे ज्येष्ठ नागरिक दशरथ दगडुजी देशमुख यांचे बुधवारी (दि. २३)



वयाच्या ९४व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे कनिष्ठ बंधू केशव देशमुख, त्यांची मुले विजय, सुनील व कन्या लता, अरुणा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कै. दशरथ देशमुख यांचा दशक्रिया विधी शुक्रवारी (दि. ४ मार्च) सकाळी १० वाजता श्रीक्षेत्र संगमेश्वर (ता. मुरबाड, जि. ठाणे) येथे होणार आहे, तर उत्तरकार्य शनिवारी (दि. ५ मार्च) पनवेल येथे घरी होणार आहे.


मा. गोडसे साहेब सो.
प्रोसेस फी जमा रू. अर्जदारातर्फे वकील कु. सोनिया ना. शिरसाठ

**जाहीर नोटीस**

दिवाणी चौकशी अर्ज नं. १७८८/२०२१
नि. ७/ड
ने.ता. ३०/०४/२०२२

**पनवेल येथिल में. दिवाणी न्यायाधिश सो.**
**कनिष्ठ स्तर, पनवेल यांचे न्यायालयात**

श्रीमती. लता आनंद चव्हाण व इतर ३ .... अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ..... जाबदार

सर्व लोंकाना या नोटिसद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, **कै. आनंद श्रीपत चव्हाण यांचे दि. २४/१०/२०१६ रोजी जे जे हॉपिटल, मुंबई** येथे मयत झाले असून त्यांचे कायदेशिर सरळ वारस म्हणून अर्जदार **श्रीमती. लता आनंद चव्हाण** रा. वृंदावन को-ऑप-हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.२९/४१, सेक्टर नं. ०९, खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड, महाराष्ट्र-४१०२०६ **यांनी खालील वर्णणाच्या मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.**

**मिळकतीचे वर्णन**

वृंदावन को-ऑप-हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. २९/४१, सेक्टर नं. ०९, खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड,

वरील अर्जदार हे मयत कै. आनंद श्रीपत चव्हाण यांचे वारस आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या में. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे में. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील.

सही/-
क. लिपीक

कोर्टाचा शिक्का

sd/-
Asstt. Superintendent
civil Court, Panvel

## निवडक

### पनवेलमधून टेम्पोची चोरी

**पनवेल :** शहरातील मार्केट यार्ड परिसरातून महिंद्रा कंपनीच्या सफेद पीकअप टेम्पोची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे. गुलाम हुसेन चौधरी यांनी त्यांच्या ताब्यातील दिड लाख रुपये किमतीचा महिंद्रा कंपनीच्या सफेद पीकअप टेम्पो (एमएच-०४-जेसी-१७७९) हा शहराजवळील भारत ग्लास शोरुमच्या पाठीमागे व एस ग्लास गोडावूनच्या समोर मार्केट यार्डजवळ उभा करून ठेवला होता. या वेळी अज्ञात चोरट्यांनी टेम्पो चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### तळोजात एकाची ऑनलाइन फसवणूक

**पनवेल :** इन्शुरन्सला सिक्युरिटी देऊन कमी पैशात प्रोटेक्शन देऊ असे सांगून क्रेडीट कार्डची डिटेल घेतली आणि ३२ वर्षीय व्यक्तीची एक लाख ८६ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तळोजा फेज वन सेक्टर १४, येथील मनीष भास्कर पाटोळे यांना एका महिलेने फोन करून एसबीआय बँकेतून बोलत असल्याचे सांगितले. तुमच्या इन्शुरन्सला सेक्युरिटी देऊन कमी पैशात प्रोटेक्शन देतो असे सांगितल्यावर क्रेडिट कार्डची डिटेल मागून मोबाइलवर आलेला ओटीपी विचारण्यात आला. पाटोळे यांनी ओटीपी देताच क्रेडिट कार्डमधून एक लाख ८५ हजार ८४० रुपये वजा झाले. त्यानंतर तुमच्या अकाउंटला उद्या पैसे येऊन जातील असे त्या महिलेने सांगितले आणि फोन कट केला. अनोळखी महिलेने फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

### मृतांची ओळख पटविण्याचे आवाहन

**पनवेल :** पुणे मुंबई एक्सप्रेस हायवे वर मुंबई लेनवर कळंबोली सर्कल पासून १.५ किलोमीटर अंतरावर रिक्षाचा अपघात झाला होता. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला, यातील एकाची ओळख पटली असून दुसऱ्या मृत्यू झालेल्या व्यक्ती ओळख पटवण्याचे आव्हान खांदेश्वर पोलिसांसमोर आहे. रिक्षावरील मयतचालक अप्पू शेखप्पा अल्लूर (वय ४९) आहे. तर दुसऱ्या मृत इसमाचे वय अंदाजे ५० वर्षे, चेहरा रक्ताने माखलेला, केस काळे-पांढरे असून अंगात खाकी शर्ट व निळी जीन्स पॅन्ट घातलेली आहे. या बाबत अधिक माहिती असल्यास सहाय्यक पोलीस निरीक्षक एस. डी. कामत यांच्याशी संपर्क साधावा.

### देवदर्शनासाठी आलेला व्यक्ती बेपत्ता

**पनवेल :** मानघर येथील श्री क्षेत्र अक्षयधाम मंदिर येथे देवदर्शनासाठी आलेला व्यक्ती बेपत्ता झाल्याने तो



हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बाळकृष्ण दिगंबर धोत्रे (वय ३६) असे या व्यक्तीचे नाव असून उंची पाच फुट पाच इंच, रंग गव्हाळ, डोक्यासमोरील भागाला टक्कल, कपाळावर उजव्या भुईच्यावर मोठा तिळ आहे. अंगात पांढरा शर्ट व त्यावर काळे जॅकेट व राखाडी पॅन्ट घातलेली आहे. सोबत मोबाइल असून त्याला मराठी भाषा अवगत आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पोलीस नाईक विष्णू गावडे यांच्याशी संपर्क साधावा.

### उरणमध्ये स्वच्छता अभियान



**उरण :** ज्येष्ठ नागरिक मंडळ आणि लिवी टीमच्या वतीने शिवजयंतीनिमित्त उरण तालुक्यातील मुळेखंड कोळीवाडा आणि कुंभारवाडा (चाणजे, उरण) येथे संत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत गावात सामाजिक बांधिलकी जपत साफसफाई करण्यात आली. या वेळी जेष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश म्हात्रे, कार्याध्यक्ष अनंत पाटील, लिवी टीमचे सीईओ जुगनू कोळी, एचओडी हंडोरे सर, प्रोफेसर किरण घुमारे, लिवी टीमचे सर्व मेंबर, गाव अध्यक्ष जयराज म्हात्रे आदी उपस्थित होते.

### प्रकाश गायकवाड यांना पुरस्कार

**मोहोपाडा :** किल्ले पर्यटन महोत्सव सेवा संशोधन केंद्र आणि राष्ट्रीय सह्याद्री गड किल्ले कला, साहित्य संमेलन सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिंना सन्मानित करण्यात आले. यात रसायनी येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाश ग्यानोजी गायकवाड यांना राज्यस्तरीय राष्ट्रीय कतृत्व जीवनगौरव पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. देशाचे स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, धर्मनिरपेक्षता व एकात्मता टिकविण्यासाठी स्वावलंबी समाज घडविण्यासाठी त्यांनी सम्यक सामाजिक संस्थेच्या माध्यमातून आरोग्य, शिक्षण तसेच सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहिल्याने त्यांना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# विविध मागण्यांसाठी आदिवासी आक्रमक

## श्रमजिवी संघटनेच्या नेतृत्वात पनवेल तहसील कार्यालयासमोर मोर्चा

**पनवेल : वार्ताहर**

अद्यापही मुलभूत सोयी सुविधांपासून आदिवासी बांधव वंचित असल्याने त्यांच्या विविध मागण्यांसाठी शुक्रवारी (दि. २५) श्रमजिवी संघटना-महाराष्ट्र यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.




या मोर्चाला संघटनेचे सरचिटणीस बाळाराम भोईर, जिल्हाध्यक्ष हिरामण नाईक, जिल्हा महिला प्रमुख कुंदा पवार, तालुका अध्यक्ष बाळू वाघे, तालुका उपाध्यक्ष बाबुराव शिंदे, शहरप्रमुख राम नाईक, शेतकरी प्रमुख भगवान वाघमारे, कचरु कातकरी, तालुका उपाध्यक्ष सुमन नाईक, बाबुराव लेंडे, पंढरीनाथ कातकरी, संतोष वाघे, अरुण वाघमारे, तुळशीराम जाधव, बळीराम कातकरी, आनंदी कातकरी आदींसह शेकडो समाज बांधव या मोर्चात सहभागी झाले होते.

यामध्ये प्रामुख्याने त्यांनी अद्यापपर्यंत त्यांच्या आदिवासी वाड्यांना रस्ते नाही, वीज पुरवठा नाही, अनेक ठिकाणी पाण्याचा दुष्काळ आहे तसेच कित्येक ठिकाणी रेशन धान्य सुद्धा देण्यात येत नाही किंवा देण्यात येणारे रेशन सुद्धा कमी प्रमाणात असते. विविध घरकूल योजना, सार्वजनिक शौचालय, स्मशानभूमी त्याचप्रमाणे शासकीय योजनांचा फायदा या आदिवासी बांधवांना अद्यापपर्यंत मिळाला नाही.

राज्य सरकारने याकडे लक्ष घालून या सर्व योजना आदिवासी बांधवांना देण्यात याव्यात व त्यांना मुलभूत हक्कांपासून वंचित ठेवू नये यासाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. या संदर्भातील निवेदन त्यांनी पनवेल तहसील कार्यालयाला दिले आहे.

# असंघटित कामगारांनी सीएससीमार्फत ऑनलाइन नोंदणी करणे गरजेचे -डाके

**पनवेल : प्रतिनिधी**

असंघटित कामगारांनी आपली सीएससीमार्फत ऑनलाइन नोंदणी करणे गरजेचे असल्याने महापालिकेच्यावतीने प्रभाग अधिकारी त्या त्या प्रभागांमध्ये असंघटित कामगारांच्या नोंदणी विषयीचे आवाहन करणार आहेत. या आवाहनाला नागरिकांनी सकारात्मक सहकार्य करावे, असे प्रतिपादन यावेळी उपायुक्त विठ्ठल डाके यांनी केले.

केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दिनांक ३१ डिसेंबर २००८ ला असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारीत केलेला आहे. या अंतर्गत असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने असंघटित कामगारांचा डेटाबेस (NDUW) तयार करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार केंद्र शासनाने २६ ऑगस्ट २०२१ रोजी असंघटित कामगारांची नोंदणी करण्याकरिता ई-श्रम पोर्टल कार्यान्वीत केले आहे.

नोंदणीकृत असंघटित कामगारांना शासनाच्या सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार आहे. ईश्रम नोंदणीनंतर अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास दोन लाख तर अंशत: अपंगत्व् आल्यास १ लाखाचा विमा मिळणार आहे. स्थलांतरीत कामगारांची माहिती ठेवणे शासनासाठी सुखकर होणार आहे. महापालिकेच्या सहकार्यातून असंघटित कामगारांची नोंदणी केली जावी याकरिता गुरुवारी (दि. २४) मुख्यालयात उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक कामगार आयुक्त शितल कुलकर्णी, गटविकास अधिकारी भोये, शासकीय कामगार अधिकारी स्नेहल माटे तसेच महापालका अधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

स्वयं रोजगार, घरेलु कामगार, असंघटित क्षेत्रात वेतनावर काम करणारे कामगार, फळ व भाजीपाला विक्रेते, वृत्तपत्रे विक्रेते, विडी कामगार, शेत मजूर, रिक्षाचालक, मुक्त पत्रकार, फेरीवाले व इतर सुमारे ३०० उद्योग व्यवसायातील कामगार तसेच संघटित क्षेत्रातील इतर कामगार ज्याना कामगार कायद्याचे संरक्षण नाही असे कामगार यामध्ये नोंदणी करू शकतात.

नोंदणी करण्याकरिता पात्रता वय १६ ते ५९ वर्ष असून असंघटित क्षेत्रामध्ये काम करणारी कोणतीही व्यक्ती यामध्ये नोंदणी करू शकते. फक्त नोंदणी करणारे कर्मचारी हे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि कर्मचारी राज्य विमा योजनेचे सभासद नसावेत. या नोंदणीसाठी आधारकार्ड, बँकेचे पासबुक (राष्ट्रीयकृत बँक अथवा आयएमएससी कोड असलेली इतर कोणतीही बँक), स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक अथवा कुंटुंबातील अन्य व्यक्तीचा भ्रमणध्वनी क्रमांक, ही कागदपत्रे आवश्यक आहे. तसेच स्वयं नोंदणीकरीता कामगाराचा भ्रमणध्वनी क्रमांक आधारकार्डशी लिंक असणे आवश्यक आहे.

ही नोंदणी स्वतः कर्मचाऱ्यालादेखील करता येऊ शकते तसेच नागरी सुविधा केंद्रांमध्ये जाऊनही करता येऊ शकते. त्याबरोबरच ई-श्रम पोर्टल eshram.gov.in या अधिकृत वेबसाईटवरती जाऊन नोंदणी करता येऊ शकते. या नोंदणी करीता कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. कामगाराची नोंदणी प्रकिया पुर्ण झाल्यावर कामगारांस नागरी सुविधा केंद्रातील प्रतिनिधी कडून ए४ आकाराच्या पेपरवर UAN कार्ड काढून देण्यात येईल. अधिक माहिसाठी राष्ट्रीय हेल्प लाईन नं.-१४४३४, टोल फ्री नं.-१८००१३७४१५० या क्रमांकावरती संपर्क साधावा.


## ट्रकचे चाक शरीरावरून गेल्याने वृद्धाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

ट्रकचे चाक शरीरावरून गेल्याने ६४ वर्षीय भरत शांतिनाथ आरवाडे यांचा जागीच मृत्यू झाला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

शिरढोण गाव येथील ग्रीन मेडोज सोसायटीतील प्रतीक आरवाडे आणि त्यांचे वडील भरत आरवाडे ॲक्टिवा स्कुटी घेऊन निघाले होते. ते त्यांचे काम आटोपून घरी जाण्याकरता निघाले असता मुंबई-गोवा हायवेवर टेक केअर लॉजिस्टिक गेटच्या समोर गोव्याकडे जाणाऱ्या लेन वर शिरढोणच्या दिशेने जात असताना ट्रकवरील चालकाने इशारा न देता ट्रक अचानक डाव्या बाजूला वळवला. ट्रकचा घसारा कटीवाला लागल्याने दोघेही रस्त्यावर पडले. या वेळी भरत नरवाडे यांच्या शरीरावरून ट्रकचे चाक गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर प्रतीक आरवाडे हा रस्त्याच्या बाजूला पडल्याने त्याला किरकोळ दुखापत झाली. ट्रक (एमएच ४६ एफ २९३३) वरील चालकाविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पनवेलमध्ये शेगावच्या गजानन महाराजांचा प्रकट दिन साजरा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभा गृहात, शेगांवचे महान संत, योगिराज गजानन महाराज यांचा प्रकट दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळच्या सत्रात उच्चासनांवर विराजित महारांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी शहरांतील श्रीराम चितळे यांचे सुश्राव्य किर्तन आयोजित केले होते. हार्मोनियमवर वासुदेव नातू तर तबळ्यावर गणेश जाधव यांनी बुवाना उत्तम साथ दिली.

पूर्वरंगातील भजनानंतर संत संगतीचे काय सामगू सूख! या पंक्तीने निरुपण केले. त्यामध्ये संतांचे महत्त्व विशद केले. संगिताचे उत्तम ज्ञान व मिस्किली यामुळे किर्तनात रंगत आणली. मध्यंतरानंतर 'गण गण गणात बोते' हे महाराजांचे वचन उधृत करण्यात आले. शेवटी आरती होऊन महाप्रसाद देण्यात आला. बहुसंख्य भाविक व सभासदांनी लाभ घेतला.

सायंकाळच्या बैठकीत सभासदांचे वाढदिवस साजरे झाल्यावर ज्येष्ठ महिलांचा भजन व अभंग गायनाचा कार्यक्रम झाला. सूत्रसंचालन जयवंत गुजर यांनी तर संगीत कार्यक्रमाचे निवेदन अनुप्रिता काळन यांनी केले. अध्यक्ष नंदकुमार जोशी यांनी, किर्तनकार चितळे गुरुजी, उपस्थितीबद्दल भक्तगण व ज्येष्ठ भगिनींचे आभार मानले. पसायदान व आरती होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## कामोठेजवळ गाडीला आग

**पनवेल :** सायन-पनवेल महामार्गावर पनवेलकडे जाणाऱ्या दिशेने तळोजा लिंक रोडवरील ब्रिजवर मुंबईकडून पुण्याकडे जाणाऱ्या एका खाजगी स्विफ्ट डिझायर या गाडीला चालू स्थितीत आग लागली होती. गाडीने अतिशय जलद गतीने पेट घेतला. यामध्ये कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही पण गाडीचे संपूर्ण जळून नुकसान झाले.

या घटनेची माहिती मिळताच कळंबोली अग्निशमन दलाचे अग्निशमन अधिकारी सौरभ पाटील, अग्निशमन प्रणेता सुनील सोनवणे, ड्रायव्हर दीपक पाटील, फायरमन सुरज पाटील, फायरमन हेमंत वाघमारे, फायरमन संतोष ठाकूर, फायरमन युवराज राठोड यांनी घटनास्थळी जाऊन आग आटोक्यात आणली.

## अमली पदार्थ बाळगणाऱ्या बांगलादेशी नागरिकास अटक

**पनवेल : वार्ताहर**

अमली पदार्थ विक्री करण्यासाठी आलेल्या घुसखोर बांगलादेशी नागरिकास पनवेल तालुका पोलिसांनी खारपाडा-आपटा फाटा येथून ताब्यात घेतले.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र दौंडकर यांना आपटा फाटा-खारपाडा या ठिकाणी एक व्यक्ती अमली पदार्थाची विक्री करणार असल्याबाबत माहिती मिळाली होती. गुन्हे प्रकटीकरण पथकाकडून अत्यंत सतर्कतेने, शिताफीने सापळा रचून आरोपी मुसा सुलतान खान (वय २५) याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून एकूण १३ लाख २५ हजार रुपयांचा मेथ एम्फेटामाइन याबा नामक अमली पदार्थाच्या ५४.१८० ग्रॅम वजनाच्या ५३० गोळ्या जप्त करण्यात आल्या. त्याचप्रमाणे त्याच्याकडे बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड, जन्मदाखला मिळून आला आहे.

आरोपीने भारत-बांगलादेश सीमेवरील मुलकी अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय घुसखोरी करून भारतात प्रवेश केला तसेच भारतीय नागरिकांना देण्यात येणाऱ्या व नमूद वर्णनाच्या बनावट कागदपत्राच्या आधार घेऊन खरी असल्याचे भासवून शासनाची फसवणूक केली. या प्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपीला प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी सात दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी पनवेल पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## श्री गोवर्धनी माता मंदिर प्रवेशद्वाराचे भूमिपूजन



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूर किल्ले गावठाण येथे श्री गोवर्धनी मातेचे प्रसिद्ध मंदिर आहे. या मंदिरात दर्शनास येणाऱ्या भाविकांना मंदिराला जाण्याच्या मार्गाची दिशा कळावी. याकरिता श्री गोवर्धनी माता मंदिराचे प्रवेशद्वार एन.आर.आय. सागरी पोलीस ठाणेसमोर पामबीच मार्गावर नवी मुंबई मनपाकडून उभारण्यात येणार आहे. या प्रवेशद्वाराचे भूमिपूजन श्री गोवर्धनी माता मंदिर संस्थेच्या अध्यक्ष, आमदार मंदा म्हात्रे यांच्या शुभहस्ते विधिवत पूजा करून झाले.

या वेळी भाजपा जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, महामंत्री डॉ.राजेश पाटील, डॉ. जयाजी नाथ, संपत शेवाळे, अशोक गुरखे, दत्ता घंगाळे, गोपाळ गायकवाड, दीपक पवार, राजेश राय, विकास सोरटे, जयश्री चित्रे, अनंता बोस, सुहासिनी नायडू, दर्शन भारद्वाज,जयवंत तांडेल, कल्पेश कुंभार, राजु तिकोने, श्रीराम घाटे, ज्योती पाटील, प्रियांका म्हात्रे, पांडुरंग आमले, मनपाचे कार्यकारी अभियंता अजय संख्ये यासह भाविक उपस्थित होते. सदर मंदिराचे प्रवेशद्वार हे दक्षिणात्य पद्धतीचे बांधण्यात येणार असून ३९ लाख ३४ हजार रुपयांचा अपेक्षित खर्च होणार असून सहा महिन्यात बांधकाम पूर्ण होणार आहे.

नवी मुंबईतील सुमारे ४०० वर्षांपूर्वीचे पुरातन पेशवेकालीन श्री गोवर्धनी मातेच मंदिर आहे. भक्तांना नवसाला पावणारी आई म्हणून श्री गोवर्धनी माता प्रसिद्ध आहे. श्री गोवर्धनी मातेचे मंदिर हे निसर्गाने मुक्त हस्ताने उधळण केलेल्या निसर्गरम्य टेकडीवर वसलेले असून मंदिराच्या जवळच असलेल्या शिवकालीन किल्ल्याचा संपूर्ण परिसर हिरवळीने नटलेला आहे. मंदिराच्या पाठीमागे विस्तीर्ण असा समुद्र किनारा लाभलेला आहे. इथं येणाऱ्या भाविकांना मंदिराला जाण्याच्या मार्गाची दिशा कळावी, याकरिता पामबीच मार्गावर प्रवेशद्वार उभारण्यात येणार आहे, असे आमदार मंदाताई म्हात्रे यांनी या वेळी सांगितले.

## शिवजयंती व संत श्री नरहरी सोनार महाराज पुण्यतिथी

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुवर्णकार समाजाचे आराध्यदैवत श्री संत नरहरी सोनार महाराज यांची ७३६वी पुण्यतिथी तसेच महाराष्ट्राचे आराध्यदैवत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती असा संयुक्त सोहळ्याचे आयोजन नवी मुंबई सुवर्णकार मंडळाच्या वतीने नवीन पनवेल येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे नवी मुंबईचे उद्योजक राजेंद्र रघूनाथ सोनार होते तर अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष संजय गजानन खरोटे हे होते. या वेळी व्यासपीठावर मंडळाचे सचिव हेमकांत सोनार, कोषाध्यक्ष विजय भामरे, कार्याध्यक्ष प्रा. शांताराम सोनारसर उपस्थित होते. सुरुवात संत श्री नरहरी महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शोभा यात्रेने झाली.

मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा. शांताराम सोनार सर यांनी संत नरहरी सोनार महाराज यांच्या ७३६व्या पुण्यतिथी निमित्ताने महाराजांवर समाज प्रबोधन केले. युवा मंडळ अध्यक्ष ऋषिकेश थोरात यांनी समाजातील युवकांनी काळची गरज ओळखून एकत्र येण्यासाठी आवाहन केले. महिला मंडळ सचिव कल्पना सोनार (ऐरोली) यांनी कोविड-कोरोना काळात सुवर्णकार महिला मंडळाने राबविलेले उपक्रम, इ. वेगवेगळ्या उपक्रमाविषयीची माहिती दिली.श्रीनिवास पोतदार, धोंडू विसपुते, चंद्रकांत



चव्हाण, तुषार भामरे, पंकज पोतदार, मानसी दुसाने, ऋषिकेश पुंजाराम थोरात आदींचा सत्कार करण्यात आला.

सांस्कृतिक कार्यक्रमात शिवन्या अभिजित जडे, स्वराली सोनार, वैष्णवी वाघ, ज्येष्ठ कवी मंगलदास मोरे, सोनार गुरुजी, डॉ. दिपाली विसपुते आदींनी पोवाडे, गाणे, कविता वाचन, आरत्या इ. सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतला. नवी मुंबई सुवर्णकार मंडळ, नवी मुंबई सुवर्णकार महिला मंडळ, सुवर्णकार युवक मंडळ आदी मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य, समाज बांधव आदी उपस्थित होते. कार्यक्रम स्थळी नोंदणी कक्ष, पदवीधर मतदार नोंदणीकक्ष,पाणी व्यवस्था, फोटोग्राफी, पाणी व्यवस्था,भोजन व्यवस्था, सँनिटायझर इ. यासाठी समाज बांधवांचे सहकार्य लाभले. सुत्रसंचालन अनिता उदय विभांडिक, मानसी दुसाने यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. शांताराम सोनारसर यांनी मानले.

## संपादकीय

# युद्धाचे साइड इफेक्ट्स

रशिया आणि युक्रेन या शेजारी देशांमध्ये पेटलेले युद्ध अवघ्या जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या खाईकडे घेऊन चालले आहे काय, अशी भीती व्यक्त करण्यात येते आहे. त्यात तथ्यदेखील आहेच. या युद्धामागची कारणे काहीही असली तरी या युद्धाचे पडसाद दीर्घ काळ आणि सर्वदूर उमटणार आहेत. युरोप-अमेरिकेप्रमाणेच या युद्धाची झळ भारतालाही निश्चितच बसणार आहे.

**एकेकाळी सोव्हिएत संघराज्याचे अविभाज्य घटक असलेले रशिया आणि युक्रेन हे दोन्ही देश आज स्वतंत्र राष्ट्रे म्हणून उदयाला आली आहेत. रशियासारखा देश यापूर्वीही महासत्ता होता आणि सोव्हिएत संघराज्याच्या विघटनानंतर त्याचा भूभाग कमी झाला असला तरी महासत्तेची सर्व ताकद रशिया अजुनही राखून आहे. तुलनेने शेजारचा युक्रेन लष्करी ताकदीच्या संदर्भात काहिसा दुबळा ठरतो, परंतु तेलव्यवहारामुळे दोघांचेही आर्थिक हितसंबंध परस्परांत गुंतलेले आहेत. या दोन्ही शेजाऱ्यांमध्ये युद्ध का पेटले याच्या कारणांच्या तपशीलांत आता जाण्यात फारसा अर्थ नाही. त्यासाठी क्रिमिया प्रश्नापर्यंत जावे लागेल. नाटोचा विस्तार करणार नाही असे मोघम आश्वासन अमेरिकेने अनेक वर्षांपूर्वी दिले होते, परंतु ते पाळले मात्र अजिबात नाही. नाटोच्या विस्तारीकरणामध्ये युक्रेन अमेरिकेच्या कह्यात जातो आहे हे पाहून रशियन राज्यकर्त्यांना स्वसंरक्षणासाठी युद्ध करणे भाग पडले असे समर्थन काही रशियाधार्जिणी राष्ट्रे करत आहेत. या युद्धामागची कारणे काहीही असली तरी परिणाम जगभराला भोगावे लागणार आहेत. भारतातील तब्बल २० हजार विद्यार्थी आणि विद्यार्थिनी तेथे अडकले असून त्यांना परत आणण्यासाठी भारताचे परराष्ट्र मंत्रालय शर्थीने प्रयत्न करत आहे. त्यासाठी भारतीय लष्कराची विशेषत: हवाई दलाची मदत घेतली जात आहे. युद्ध भूमीवर अडकलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना परत आणण्यासाठी विविध पातळ्यांवरून प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वत: रशियाचे सर्वेसर्वा व्लादिमीर पुतिन यांच्याशी फोनवरून चर्चा केली. काही भारतीय विमाने तेथील भारतीय नागरिकांना परत आणण्यासाठी रवाना झाली असून शेकडो विद्यार्थ्यांना सडकमार्गे बसमधून रोमेनिया गाठून भारतात परतण्याचा पर्याय पत्करावा लागला आहे. न भूतो न भविष्यति अशी ही परिस्थिती हाताळण्यासाठी केंद्र सरकार युद्ध पातळीवर काम करत असले तरी विरोधीपक्षाच्या नेत्यांना मात्र केंद्राच्या धोरणांवर टीका करण्यापलीकडे काहीही जमलेले नाही. युक्रेनमध्ये अडकलेले विद्यार्थी व अन्य भारतीय नागरिक सुखरूप परत येतील यात शंका नाही. या युद्धामुळे उद्‌भवणारे खरे आव्हान नजीकच्या भविष्यकाळातच दडलेले आहे. रशिया हा नैसर्गिक वायुचा तसेच खनिज तेलाचा जगातील सर्वांत मोठा निर्यातदार आहे. युक्रेन आणि रशिया दोघेही या तेलाचा वापर दबावासाठी करत आहेत. रशियातून युरोपकडे होणारा तेलपुरवठा युक्रेनमधून जाणाऱ्या तेलाच्या पाइपलाइनमधून होतो. या व्यवस्थेवर दोन्ही देशांचे आर्थिक हितसंबंध अवलंबून आहेत. युद्धामुळे पुरवठा कमी झाल्यास क्रुड ऑइलचे भाव येत्या काळात गगनाला भिडतील. युद्ध सुरू होताच तेलाचा भाव बॅरलला १०० डॉलरच्याही वर गेला. तो आणखीही वाढेल. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेचा डोलारा डळमळीत होण्याची भीती आहे. इंधनाचे भाव वाढल्यानंतर एकंदरीतच महागाई वाढणार हे ओघाने आलेच. कोरोनानंतरच्या काळामध्ये येणारे हे भीषण आर्थिक संकट पेलण्यासाठी मजबूत सरकार हवे. सुदैवाने ते भारताकडे आहे, हीच त्यातल्या त्यात समाधानाची बाब.**

# रायगडातील वनसंपदा, जैवविविधतेची होरपळ

**खबरबात**
**धम्मशील सावंत**

सह्याद्रीच्या कुशीत वसलेला, डोंगरदऱ्यांनी वेढलेला आणि ऐतिहासिक वारशांचा ठेवा लाभलेल्या रायगड जिल्ह्यात मानवनिर्मित वणव्यांची दाहकता वाढत आहे. मागील काही दिवसांमध्ये जिल्ह्यातील सुधागड, माणगाव, रोहा, कर्जत आदी तालुक्यातील बहुतांश भागांत लागलेल्या मानवनिर्मित वणव्यांमुळे वनसंपदा, जैवविविधता व ऐतिहासिक वस्तूंची होरपळ झाली आहे. मानवी संपत्तीचेदेखील नुकसान झाले आहे. शिवाय तापमान वाढदेखील होत आहे.

सुधागड पालीतील सरसगड किल्ल्यावर नुकताच प्रचंड मोठा मानवनिर्मित वणवा लागला होता. हा वणवा २४ तासांहून अधिक काळ सुरू होता. स्थानिक ग्रामस्थ व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी वणवा विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. त्यामुळे वणवा किमान मानवी वस्तीत आला नाही. मात्र किल्ल्याचा बहुतांश भाग होरपळला. किल्ल्यावर नव्याने लावलेले रोपे व संवर्धन केलेली झाडे जळून खाक झाली. येथील माकडे, वानरे व पक्ष्यांच्या अन्नाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांचा अधिवासदेखील नष्ट झाला. गुरुवारी (दि. १०) सुधागड तालुक्यातील ताडगाव दुधणी येथील डोंगरावर मोठा वणवा लागला होता. त्यामध्ये भाताचे माच, पेंढा, गवत, लाकूडफाटा व कुंपण जळून खाक झाले आहे.

काही दिवसांपूर्वी रोहा तालुक्यातील वरसे, कोलाड, पुई, आंबेवाडी आदी भागांत वणवे लागून वनसंपदेचे मोठे नुकसान झाले. माणगाव तालुक्यातील विळे भागाड एमआयडीसी भागातील डोंगरावर व माळरानावर डिसेंबर महिन्यात वणवा लागला होता. स्थानिक पर्यावरण व निसर्ग अभ्यासक राम मुंढे यांनी या भागाची पाहणी केली असता या वणव्यामध्ये ठिपकेवाली मुनिया आणि इतर पक्ष्यांची घरटी पूर्णपणे जळून गेली होती. शिवाय पूर्ण विकसित झालेली अंडीदेखील जळाली. पक्ष्यांचा अधिवास व खाद्यदेखील नष्ट झाले होते. अशाच प्रकारचे वणवे जिल्ह्यात विविध ठिकठिकाणी लागणे सुरू झाले आहे.

### ■ जैवविविधता धोक्यात

*नैसर्गिक व कृत्रिम वणव्यांमुळे जैवविविधता व सजीव सृष्टी धोक्यात येत आहे. पर्यावरणाची प्रचंड हानी होते. प्रदुषण वाढते. सरटणारे जीव (घोरपड, साप, सरडे, विंचू इत्यादी), किटक तसेच झाडे-झुडपे, औषधी वनस्पती आगीमध्ये भस्मसात होतात. फुलपाखरांना त्यांचे अन्न मिळविता येत नाही. विविध प्राण्यांचे व पक्ष्यांचे आसरे-निवारे संपुष्टात येतात. त्यांची पिल्लेदेखिल या आगीत होरपळून मरतात. दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींना देखिल वणव्यांमुळे धोका संभवतो.*

### ■ ऐतिहासिक वास्तू व किल्ल्यांना हानी

*वणव्यांमुळे छोट्या-मोठ्या गड-किल्ल्यांचे व ऐतिहासिक ठेव्यांचे बांधकाम कमकुवत होऊन ते ढासळण्याची भीती असते. किल्ल्याच्या तटबंदीवर, बुरुजांवर उगवलेले गवत जळाल्यामुळे त्यांचे नुकसान होते. वणव्यात वनसंपदा नष्ट होत असल्यामुळे येथे राहणाऱ्या पशूपक्षांची अन्नपाण्यासाठी खुप वाताहत होत आहे. तेथील मोर, माकड व भेकर हे प्राणी अन्नपाण्यासाठी दहिदिशा भटकतात.*


### ■ ठोस उपाययोजना हव्यात

*कृत्रिम वणव्यांमुळे संपुर्ण सजीव सृष्टी धोक्यात येते. पर्यावरणाचा ऱ्हास होतो. त्यामुळे वणवे रोखण्यासाठी वनविभागाच्या माध्यमातून विविध उपाय व जनजागृती केली जाते. शिक्षक राम मुंढे यांनी शाळकरी मुलांच्या माध्यमातून वणवे रोखण्यासाठी विविध उपाययोजना राबविल्या आहेत. विविध शाळेतील विद्यार्थी पथनाट्य सादर करतात. मात्र हे प्रयत्न अपुरे आहेत. या उपायांबरोबरच स्थानिक लोकांना व आदिवासींना वणव्याचे दुष्परिणाम सांगून त्यांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. प्रामुख्याने वनविभाग, निसर्गप्रेमी व आदिवासी विद्यार्थ्यांच्या मदतीने जनजागृती करण्याची गरज आहे. तसेच दृकश्राव्य माध्यमांद्वारे वनव्यांमुळे होणारी हानी सर्वांसमोर आणली गेली पाहिजे. लोकांनीदेखील स्वयंस्फूर्तीने वणवे रोखणे व स्वतः लावणार नाही यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.*

**“ बहुतांश वणवे मानवनिर्मित आहेत. वणवे रोखण्यासाठी व आपत्ती निवारणासाठी गावपातळीवर १० तरुणांची टीम तयार करून त्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. मानवनिर्मित वणवे रोखण्यासाठी गावागावातील लोकांचे प्रबोधन व जनजागृती केली जात आहे. ग्रामपंचायतींनादेखील आवाहन केले आहे.**
**-दिलीप रायण्णावार, तहसीलदार, पाली सुधागड**

**“ वणव्यांमुळे ऐतिहासिक वास्तू, वनसंपदा व जैवविविधतेचे प्रचंड नुकसान होत आहे. वनविभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. मानवनिर्मित वणवे सर्वाधिक आहेत. गेली अनेक वर्षे सरसगड व इतर ठिकाणी लावलेली व संवर्धन केलेली झाडे सततच्या वनव्यांत बळी गेली आहेत, याचे खूप दुःख होते.**
**-केतन म्हसके, उपाध्यक्ष, शिवऋण प्रतिष्ठान पाली**





(छाया : संतोष पेरणे)

# मिळखतखार-मळा रस्त्याला ग्रामस्थांचा विरोध

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर



**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यातील मिळखतखार-मळा या रस्त्याचा विषय गेली काही दिवस माध्यम-समाजमाध्यमातून चर्चेला आला आहे. मात्र काही ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर तसेच प्रांताधिकारी, तहसीलदार यांना निवेदन सादर करून विरोधी भूमिका मांडली आहे.

मिळखतखार-मळा या गावात जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने तेथील ग्रामस्थांनी रस्त्याच्या मागणी साठी काही दिवसांपूर्वी 'रस्ता नाही तर मत नाही' असे फलक लावून राजकीय पुढारी, प्रशासकीय अधिकारी यांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यांच्या या प्रयत्नांना काही अंशी यशदेखील आल्याचे समजते. परंतु आता हा रस्ता होऊ नये, त्यामुळे सुपीक शेतजमीन नापीक होईल अशी भीती व्यक्त करून काही ग्रामस्थांनी रस्त्याच्या मागणीला विरोध दर्शविला आहे.

रुपेश वसंत कडवे, साईनाथ रामचंद्र कडवे, अर्जुन गणपत ठोंबरे, सुरेश अनंत ठोंबरे, चंद्रकांत भास्कर ठोंबरे यांच्यासह अन्य २० जणांच्या स्वाक्षऱ्या असलेले रस्त्याला विरोध दर्शविणारे निवेदन नुकतेच जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे.

या निवेदनात मिळखतखार ग्रामस्थांनी म्हटले आहे की, मिळखतखार- मळा रस्त्यालगत त्यांच्या शेतजमिनी आहेत. या जमिनीत ते भातशेती, वाल, पापडी यासारखी पीके घेत आहेत. रस्त्यामुळे ही पिकती शेती नापीक होईल.

शेतकऱ्यांच्या मालकीची प्रत्येकी ४ ते ५ गुंठे जमीन या रस्त्यासाठी बाधित व नापीक होणार असल्याने, त्यांचा रस्त्यासाठी विरोध आहे. कोणत्याही परिस्थितीत रस्त्याला परवानगी देऊ नये अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

मळा हे गाव डोंगर दऱ्यातून येणाऱ्या नदीच्या पात्राशेजारी वसले आहे. पावसाळ्यात या गावाला पूरपरिस्थितीला सामोरे जावे लागते. नदीच्या दोन्ही बाजूला कच्च्या स्वरूपाचे बांध आहेत. हे दोन बांध भराव घालून मोठे केले व रस्त्याला जोडले तर गावातील लोकांची रस्त्याची समस्या सुटेल, असा पर्यायदेखील या निवेदनातून मांडण्यात आला आहे. एकूणच मिळखतखार-मळा हे गाव रस्त्याच्या समस्येमूळे चर्चेत आले आहे, पण हीच समस्या वादाचा विषयदेखील बनली आहे, त्यामुळे जिल्हाधिकारी काय भूमिका घेतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.



# नसरापूर येथे बचतगटांसाठी मार्गदर्शन

**कर्जत : बातमीदार**

आदित्य दृष्टी सामाजिक विकास प्रतिष्ठित मार्फत कर्जत तालुक्यातील नसरापूर ग्रामपंचायत कार्यालयात बचतगट सक्षम आणि स्वावलंबी होण्यासाठी महिलांना मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिबिरात प्रशिक्षक सुवर्णा चव्हाण यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

सरपंच प्रमिला मोहिते, उपसरपंच दीपा कोळंबे, योगिता कोळंबे, कविता हिलम, ज्ञानगंगा ग्रामसंघाच्या हर्षदा थोरवे, सारिका कोळंबे, सविता तिखंडे, नम्रता म्हात्रे, मनिषा देशमुख, जगदीश दगडे, प्रज्ञा वाघमारे, वृषाली शिंदे, रोशनी कोळंबे, ग्रामपंचायत कर्मचारी मोतीराम कोळंबे, शरद तिखंडे यांच्यासह नसरापूर ग्रामपंचायत विभागतील महिला बचतगटाच्या सदस्या या शिबिरात सहभागी झाल्या होत्या.

## आरोग्य प्रहर

# जाणून घ्या मधुमेहींना नारळ पाणी प्यावे की नाही

मधुमेहाने त्रस्त असलेल्यांना विशेषतः साखरयुक्त पेयांपासून लांब राहण्याचा सल्ला दिला जातो. आधीच मधुमेह असल्याने बाहेरील अन्नघटकांमुळे रक्तातील साखर अजून न वाढावी यासाठी अनेक जण आपल्या जेवनातूनच असे अन्नघटक वर्ज करीत असतात. सोबतच साखरेची पातळी वाढू नये या विचाराने नैसर्गिक गोड फळे खाणेही टाळतात. असाच काहीसा गोंधळ नारळ पाण्याबाबतही कायम असतो. नारळाच्या पाण्यामुळे शरीरातील साखरेचे प्रमाण वाढते असा अनेकांचा समज असतो. त्यामुळे नारळ पाण्याचे सेवन केले जात नाही. अनेकांना याबाबत शंका असते. जर तुमच्याही मनात शंका असेल की मधुमेहाच्या रुग्णाने नारळ पाणी प्यावे की नाही, तर या लेखातून सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील.



**साखर नियंत्रित ठेवण्यास मदत**

मधुमेहाच्या रुग्णांवर नारळ पाण्याचा काय परिणाम होतो, याबद्दल मानवांवर कोणतेही विशेष संशोधन झालेले नाही. परंतु प्राण्यांवर केलेल्या संशोधनात हे सिद्ध झाले आहे की नारळ पाणी सेवन केल्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहते. नारळाच्या पाण्यात आढळणारे पोटॅशियम, मॅग्नेशियम, व्हिटॅमिन सी इत्यादी इंसुलिनचे कार्य सुधारण्यास मदत करतात, ज्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत होते.

**मर्यादित करावे सेवन**

'जर्नल ऑफ मेडिसिनल फूड'मध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासात असेही म्हटले आहे, की नारळाचे पाणी मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यास मदत करू शकते. नारळाच्या पाण्यात नैसर्गिकरित्या गोडवा असतो. त्यात 'फ्रक्टोज' देखील आहे. त्यामुळे नारळाचे पाणी जास्त प्रमाणात सेवन करू नये. तज्ज्ञांच्या मते, मधुमेहाच्या रुग्णांनी दररोज १ कप (२४० मिली) पेक्षा जास्त नारळाचे पाणी पिऊ नये..

**नारळ पाण्याचे फायदे**

नारळ पाण्यामुळे शरीराला 'हायड्रेट' ठेवता येते. यामुळे किडनी स्टोनच्या आजारापासून दूर राहू शकता. शरीरातील पाण्याचे संतुलित प्रमाण राखण्यासाठी नारळ पाणी एक चांगला स्रोत आहे. नारळाचे पाणी कोलेस्टेरॉल आणि ट्रायग्लिसराइड्स कमी करून हृदयविकारापासून वाचवते. नारळ पाण्यात पोटॅशियमचे मुबलक प्रमाण असते. ते रक्तदाब कमी करण्यासही मदत करते. नारळाचे पाणी अँटिऑक्सिडंट ने भरपूर असते. त्यामुळे शरीरातील रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होत असते.

# अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश स्वामी यांची खालापूर न्यायालयास भेट

(छाया : विनायक माडपे)



**खोपोली : प्रतिनिधी**

वकीलांनी जास्तीत जास्त दावे मध्यस्थीच्या माध्यमातून मिटवावेत, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश स्वामी यांनी खालापूर येथे केले.

लोक अदालत व कायदेशीर मार्गदर्शन याकरिता अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश स्वामी यांनी अलीकडेच खालापूर न्यायालयास भेट दिली. त्यावेळी खालापूर बार असोसिएशनने आयोजित केलेल्या वकिलांच्या सभेत न्या. स्वामी मार्गदर्शन करीत होते. १२ मार्च रोजी होणाऱ्या लोकअदालतमध्ये वकीलांनी मोठ्यात मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढावीत, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

तालुक्यात कायदेविषयक मार्गदर्शन शिबिरे यशस्वी केल्याबद्दल अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश स्वामी यांनी खालापूर न्यायालयातील न्यायाधीश, वकील व न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे या वेळी कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. पद्मा पाटील यांनी केले. खालापूर दिवाणी न्या. वागळे, सह दिवाणी न्या. माने, न्या. सपकाळ मॅडम, ॲड. योगेश मानकवळे, ॲड. वसंत नामजोशी, ॲड. राजेंद्र येरुणकर, ॲड. विकास म्हात्रे यांच्यासह वकील बहुसंख्येने यावेळी उपस्थित होता.

# मजगावच्या सुश्रिता दासची 'एम्स'मध्ये निवड



(छाया : संजय करडे)

**विद्यालयातर्फे सत्कार**

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील मजगाव येथील नाज ॲकॅडमी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाची सुश्रीता उत्तमकुमार दास हिची पुढील शिक्षणासाठी गोरखपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) मध्ये निवड झाली असून देशाच्या सर्वोच्च वैद्यकीय शिक्षण संस्थेत निवड होणारी रायगड जिल्ह्यातील ती पहिली विद्यार्थिनी ठरली आहे. त्याबद्दल सुश्रीता दास आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या अफ्फान परवेज पठाण या दोघांचा ॲकॅडमीतर्फे सत्कार करण्यात आला.

खडतर मेहनत घेतल्यास स्पर्धा परीक्षेतही असे यश मिळते. विद्यार्थ्यांनी सुश्रीता व अफ्फान यांचा आदर्श घेण्यासाठीच त्या दोघांच्या सत्कार समारंभाचे आयोजन केल्याचे माजी मुख्याध्यापक प्रकाश मसाल यांनी सांगितले.

उदय खोत यांनी उपस्थितांचे स्वागत केले. नायब तहसीलदार अमित पुरी, सर एस. ए. हायस्कूलचे मुख्याध्यापक राणे, केंद्र प्रमुख बिलकिस फिरफिरे, डॉ. रुबा फिरफिरे, उजमा शहबाज तांडेल यांची भाषणे झाली. या वेळी सुश्रीता व अफ्फान यांचा त्यांच्या आई वडिलांसह शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सुश्रीता व अफ्फान यांनी सत्काराला उत्तर दिले.

मतिन हमदुले व दिलशाद दामाद यांनी सूत्रसंचालन केले. पोलीस उपनिरिक्षक श्रीकांत म्हात्रे, नाज एज्युकेशन ट्रस्टचे संचालक शहबाज तांडेल, माजी सरपंच अजित कासार, चंद्रकांत कमाने, अ. रहमान कबले, अस्लम हलडे, हिलाल हलडे, मुख्याध्यापिका मेघा भंडारे आदी या वेळी उपस्थित होते. प्रीतम वाळंज यांनी आभार मानले.

# युक्रेनमध्ये अडकले रायगड जिल्ह्यातील २५ विद्यार्थी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. भारतातील १२ हजारांपेक्षा जास्त लोक युक्रेनमध्ये असून त्यापैकी १२००च्यावर विद्यार्थी आहेत. शिक्षणासाठी गेलेले रायगडमधील २५ विद्यार्थी युक्रेनमध्ये अडकल्याची माहिती पालकांनी जिल्हा प्रशासनाला कळवली आहे.

युक्रेनवर रशियाने हल्ला केला आहे. युक्रेनमध्ये गेलेले अनेक भारतीय तेथे पडले आहेत. या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या वतीने प्रत्येक राज्यातील जिल्हा प्रशासनाला युक्रेनमध्ये शिक्षणासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांची माहिती घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

शिक्षणासाठी गेलेले रायगडमधील २५ विद्यार्थी युक्रेनमध्ये अडकल्याची माहिती पालकांनी जिल्हा प्रशासनाला कळवली आहे. रशियाने युक्रेनवर हल्ला केला आहे. त्यामुळे तिथे सध्या दहशतीचे वातावरण आहे. येथील युद्धामुळे देशातील तब्बल १२ हजार नागरिक आणि विद्यार्थी युक्रेनमध्ये अडकून पडले आहेत.

भारतीय नागरिकांना माय देशी परत आणण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने तातडीने मदत करावी, अशी मागणी आता पालकांमधून जोर धरु लागली आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना मायदेशी परत आणण्यासाठी जिल्हा प्रशासन परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधून प्रयत्न करीत आहे. अडकलेल्या या विद्यार्थ्यांनी भारताकडे मदतीची मागणी केली आहे.

**भारतात येण्यासाठी वाट पाहणारे विद्यार्थी**

*आर्यन पाटील (पेण झिराड), कोमल पाटील (पेण शिर्की बोरावे), अभिजित अशोक थोरात (खोपोली), साहिल म्हामूनकर (पनवेल लाडीवली), मुग्धा मोरे (महाड), पूर्वा पाटील (अलिबाग धेरंड), समीक्षा शिरसाट (पनवेल खारघर), यश कालबेरे (तळा), कल्पित मढवी (पेण), श्रद्धा पाटील (पेण), प्रेरणा दिघे (पेण), अद्वैत गाडे (पनवेल), विजया माने (कर्जत), श्रेयस टिळे (कर्जत), रुशवंती भोगले (पनवेल), साई मोरे (खालापूर), कुणाल कुवेसकर (पनवेल), शिल्पीता बोरे (पनवेल), अमर करंजीकर (माणगाव), तुराम बेरादर (बिरवाडी महाड), शोहिब पठाण (बिरवाडी महाड), सालवा धनसे (खोपोली), जयपाल भैरवसिंग परमार (मोहोपाडा, खालापूर), प्रचिती पवार (करंजाडे पनवेल), नहुष गौतम गायकवाड (नागोठणे) हे २५ विद्यार्थी युक्रेनमध्ये अडकले आहेत.*

## पेण दुरशेतजवळ दुचाकीला अपघात; एकाचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर पेण जवळील दुरशेत गावाच्या हद्दीत बुधवारी पहाटे दुचाकी घसरून अपघात झाला. या दुचाकी चालकाचा मृत्यू झाला तर त्याचा सहप्रवासी जखमी झाला.

निकेश लक्ष्मण दोरकडे (वय २८) व अकलेश जाधव (वय २७, रा. वडाळा, मुंबई) हे दोघे दापोली येथील फोटोग्राफीचे काम उरकून दुचाकी (एमएच-०१,डीयु-१३६४) वरून वडाळा येथील आपल्या घरी येत होते. पेणजवळील दुरशेत गावाजवळ त्यांची दुचाकी घसरून ते दोघे रस्त्यावर आदळले. या अपघातात निकेश याचा मृत्यू झाला. अकलेश गंभीर जखमी. त्याला कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या अपघाताची नोंद दादर सागरी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास उपनिरक्षक भऊड करीत आहेत.

# पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी लिविंग लिजेंड पुरस्काराने सन्मानित

## सचिनदादा यांना युरोपियन विद्यापीठाची मानद डॉक्टरेट



(छाया : अरूण नलावडे)




**खालापूर : प्रतिनिधी**

सामाजिक, शैक्षणिक व समाजसेवा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांना युरोपियन इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ पॅरिस या संस्थेने शुक्रवारी (दि. २५) बँकॉक येथे लिविंग लिजेंड हा पुरस्कार देवून सन्मानित केले. तर सचिनदादा धर्माधिकारी यांना सामाजिक कार्याबद्दल मानद डॉक्टरेट ही पदवी बहाल केली.

थोर निरुपणकार नानासाहेब धर्मधिकारी यांचे कार्य त्यांचे सुपुत्र पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्मधिकारी व नातू सचिनदादा धर्माधिकारी यशस्वीरित्या करीत आहेत. आप्पासाहेब यांनी सामाजिक क्षेत्रात दिलेल्या योगदानामुळे त्यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले आहे. शुक्रवारी बँकॉक येथे झालेल्या कार्यक्रमात युरोपियन युनिव्हर्सिटी पॅरिस या संस्थेने आप्पासाहेबांना लिविंग लिजेंड हा पुरस्कार तर सचिनदादा यांना मानद डॉक्टरेट ही पदवी प्रदान केली. हा सोहळा सुरू असताना रायगडसह संपूर्ण महाराष्ट्रात श्री सदस्यांसह व दास भक्तांनी फटाक्यांच्या आतिषबाजीत जल्लोष साजरा केला. खोपोलीतील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये फटाक्यांची आतिषबाजीमुळे झालेला कचरा श्री सदस्यांनी गोळा करून परीसर स्वच्छ केला.

# गावठी दारूच्या चार हातभट्ट्या उद्ध्वस्त

**५२ हजाराचा मुद्देमाल केला नष्ट; नागोठणे पोलिसांची कामगिरी**

(छाया : राज वैशंपायन)






**नागोठणे : प्रतिनिधी**

चेराटी, काळकाई जंगल परिसरातील गावठी दारू तयार करण्याच्या चार हातभट्ट्या नागोठणे पोलिसांनी बुधवारी (दि. २३) उद्ध्वस्त केल्या. यावेळी सुमारे ५२ हजाराचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

चेराटी, काळकाई भागातील जंगलात गावठी दारू अवैध रित्या तयार करण्यात येत असल्याची माहिती नागोठणे पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार बुधवार पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक नितिन गायकवाड, गंगाराम धूमणे, प्रतीक्षा गायकवाड, शिपाई आशिष पाटील, रामनाथ ठाकूर, सत्यवान पिंगळे, नम्रता आयर यांच्या पथकाने सदर ठिकाणी धाड टाकून चार गावठी दारूच्या बेवारस हातभट्ट्या उद्ध्वस्त केल्या. १४ प्लास्टिक ड्रम, चार लोखंडी टाक्यांसह गुळमिश्रित रसायन असे एकूण ५२ हजार रुपये किंमतीचा माल मिळून आला. तो पेटवून जागीच नष्ट करण्यात आला.

# माथेरानमध्ये दोन घोड्यांना सरा रोगाची लागण; उपचार सुरु



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

मोटार वाहनांना बंदी असल्याने माथेरानमध्ये पर्यटकांच्या प्रवासासाठी घोड्यांचा वापर केला जातो. त्यापैकी दोन घोड्यांना सरा या संसर्गजन्य रोगाची लागण झाली आहे. त्यांच्यावर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचार सुरू असून पशुधन अधिकारी त्या घोड्यांवर विशेष लक्ष ठेवून आहेत.

माथेरानमधील व्यावसायिक राजेश जानकर यांचे घोडे तबेल्यात असताना गेली तीन दिवस काहीच खाद्य खात नव्हते, त्यामुळे त्या घोड्यांना त्यांनी माथेरानमधील पशुवैद्यकीय दवाखान्यात तपासणीसाठी आणले. येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. अमोल कांबळे यांनी या घोड्यांची तपासणी केली असता त्या घोड्यांना सरा या संसर्गजन्य रोगाची लागण झाल्याचे निष्पन्न झाले. डॉ. कांबळे यांनी या दोन्ही घोड्यांवर उपचार सुरू केले. या घोड्यांना इतर घोड्यांपासून वेगळे करण्यात आले आहेत.

# खोपोलीत दासनवमीनिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात




(छाया : विनायक माडपे)

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

दासनवमी निमित्त खोपोलीतील लोहाणा सभागृहात शुक्रवारी (दि. २५) नाशिकच्या चिन्मय मिशनचे आचार्य स्वामी अद्वैतानंद यांचे प्रमुख मार्गदर्शन झाले. स्वामी अद्वैतानंद यांनी यावेळी समर्थ रामदास स्वामींनी दासबोध, मनाचे श्लोक यामध्ये केलेल्या उपदेशांचे सार उपस्थितांना समजावून सांगितले.

कै. शैलाताई बाम यांच्या प्रेरणेने खोपोलीमध्ये सुरू झालेल्या दासनवमी उत्सवाचे यंदाचे ३० वे वर्ष असून शुक्रवारी विविध कार्यक्रमांनी हा उत्सव संपन्न झाला. सुरुवातीला श्री समर्थ रामदास स्वामींच्या पादुकांचे पूजन झाले. ॲड. मीनाताई बाम, दीपक बाम व प्रसन्न बाम यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर श्रीराम जय राम जय जय राम या त्रयोदशाक्षरी मंत्राचा १०८ वेळा जप करण्यात आला. तसेच दासबोधातील एका समासाचेही वाचन झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंबादास पाठक यांनी केले. खोपोली निवासी आचार्य स्वामी मेधजानंदजी, डॉ. सुनील डोंगरे, रवींद्र घोडके, ब्राह्मण सभेचे अध्यक्ष अनिल रानडे, नरेंद्र हर्डीकर, राजेंद्र पेठे, डॉ. सुप्रिया टिळक, अच्युत धर्माधिकारी यांच्यासह अनेक समर्थभक्त या वेळी उपस्थित होते.

# नेरळ कोलीवली येथे ज्ञानयज्ञ सोहळा





**कर्जत : बातमीदार**

मानवी जीवनात चांगले काम करून किर्तीरूप उरावे. दुसऱ्याचे दोष दाखवून देण्यापेक्षा आपण किती गुणी आहोत, याचा विचार आधी करावा असे आवाहन हभप उत्तम महाराज बढे यांनी कोलीवली (ता. कर्जत) येथे केले.

श्री संत वारकरी संप्रदाय मंडळाच्या वतीने नेरळजवळील कोलीवली गावात अडीच दिवसांचा अखंड ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यात हरिकीर्तन, भजन, जागर भजन, प्रवचन, हरिपाठ आदी धार्मिक कार्यक्रम सुरू होते. मिरचोली येथील श्री विठ्ठल रखुमाई सेवा मंडळाने दररोज काकडा, भजन सादर केले. हभप हरिभाऊ महाराज पारधी आणि राजेंद्र महाराज जाधव यांनी किर्तन तर हभप ओंकार कराळे, हभप मधुकर महाराज कराळे यांनी प्रवचने सादर केली. श्री संतसेवा वारकरी संप्रदाय मंडळ आणि श्री संतसेवा वारकरी संप्रदाय मंडळ यांनी सामुदायिक हरिपाठ सादर केले. दीपोत्सव कार्यक्रमाला कर्जत तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. काल्याचे किर्तन देवाची आळंदी येथील हभप उत्तम महाराज बढे यांनी केले. देवाची आळंदीमध्ये प्रत्येक संप्रदायाने धर्मशाळा बांधाव्यात आणि तेथून सर्वांनी हरिनाम मुखी घ्यावे, असे त्यांनी या वेळी सांगितले.

मंडळाचे अध्यक्ष हभप दिगंबर तांबोळी, कार्याध्यक्ष हभप विजय महाराज पाटील, सचिव हभप ज्ञानेश्वर तांबोळी आणि खजिनदार शरद धुळे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी हा अखंड ज्ञानयज्ञ सोहळा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# पेणमध्ये नेत्रचिकित्सा शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

संत निरंकारी मिशन तसेच चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने बाबा हरदेवसिंहजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ त्यांच्या जन्मदिनी धावटे-पेण येथील संत निरंकारी सत्संग भवनमध्ये मोफत नेत्रचिकित्सा शिबिर घेण्यात आले.

या शिबिरात पेण उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रभाकर सोनावणे यांच्या मार्फत सुमारे ७० जणांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. या वेळी सेवादलामार्फत स्वच्छता अभियानदेखील राबविण्यात आले. संयोजक महादेव म्हात्रे यांनी शिबिराचा हेतु विषद केला. पेण सेवादल संचालक नितीन भोईर यांनी प्रास्ताविक केले.

पेण तालुक्यातील सेवादल युनिट ११३५ व १५०५ च्या कार्यकर्त्यांनी हे मोफत नेत्रचिकित्सा शिबिर व स्वच्छता अभियान सेवेसाठी योगदान दिले.




(छाया : अनिस मनियार)

# कर्जत रेल्वे स्थानकावर डब्यांची स्थिती दर्शविणारे फलक बसविण्याला सुरुवात

(छाया : विजय मांडे)



**कर्जत : प्रतिनिधी**

येथील रेल्वे स्थानकातील फलाटांवर एक्सप्रेस गाड्यांच्या डब्यांची स्थिती दर्शविणारे फलक बसविण्यास सुरुवात झाली आहे.

तिकीटांचे आरक्षण केल्यानंतर गाडी पकडण्यासाठी कर्जत स्थानकात येणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. आपला आरक्षित डबा शोधण्याच्या नादात कधी गाडी चुकायची तर काही वेळा डबा पकडण्याच्या नादात अपघातही व्हायचे. त्यामुळे कर्जत रेल्वे स्थानकात एक्सप्रेस गाड्यांच्या डब्यांची स्थिती दर्शविणारे छोटे डिजिटल इंडिकेटर्स बसविण्यात यावेत, यासाठी सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल गेल्या दोन वर्षापासून रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करीत होते.

रेल्वे प्रशासनान सुरुवातीला कर्जत रेल्वे स्थानकावर एक्सप्रेस गाड्यांच्या डब्यांची स्थिती दर्शविणारे छोटे डिजिटल इंडिकेटर्सची गरजच नाही, असे कळविले होते. यावर ओसवाल यांनी कर्जत रेल्वे स्थानकात डब्यांची स्थिती दर्शविणाऱ्या इंडिकेटर्सची का आवश्यकता आहे, हे पटवून दिले. त्यानंतर रेल्वे प्रशासनाने याकरिता कोणी जाहिरातदार उपलब्ध होतो काय? किंवा कुणी व्यावसायिक प्रसिद्धीसाठी उपलब्ध होतो काय? हे पाहिल्यावर कर्जत रेल्वे स्थानकावर तसे इंडिकेटर्स बसविण्यात येईल. असे ओसवाल यांना कळविले होते. ओसवाल यांनी पाठपुरावा केला असता रेल्वे प्रशासनाने ओसवाल यांना फलाट क्रमांक एकची लांबी वाढविल्यानंतर इंडिकेटर्स बसविण्यात येतील असे कळविले होते. मात्र त्यानंतरही रेल्वे प्रशासनाने दुर्लक्ष केले. शेवटी कर्जत रेल्वे स्थानकावर इंडिकेटर्स बसविले नाही, तर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिल्यानंतर या कामाला विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी मंजुरी दिली. त्यानुसार आता स्थानकात डब्यांची स्थिती दर्शविणारे फलक बसविण्यास सुरुवात झाली आहे.

> **कर्जत रेल्वे स्थानकात एक्सप्रेस गाड्यांच्या डब्यांची स्थिती दर्शविणारे छोटे डिजिटल इंडिकेटर्स बसविण्यास सुरुवात करण्यात आली आहे व येत्या काही दिवसात पूर्ण होईल. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय दूर होणार आहे.**
> **-पंकज मांगीलाल ओसवाल, सामाजिक कार्यकर्ते, कर्जत**

## वडखळ पोलिसांकडून गावठी दारू जप्त

**पेण : प्रतिनिधी**

बेकायदेशीररित्या गावठी दारूची वाहतूक करणाऱ्या इसमाला वडखळ पोलिसांनी ताब्यात घेतले असून, गाडीसह त्याच्याकडील गावठी दारू जप्त केली आहे.

शिवराम मंगेश हिरवे (रा. वाघ्रणवाडी एनघर, ता. रोहा) हा त्याच्या ताब्यातील हुंडाई कार (एमएच-०१,एएल-६३४१) मधून बेकायदेशीररित्या गावठी दारूची वाहतूक करताना वडखळ पोलिसांना मिळून आला. त्याच्या गाडीतील आठ हजार रुपये किंमतीची गावठी हातभट्टीची दारू आणि पाच लाख रुपये किमतीची कार पोलिसांनी जप्त केली आहे. याबाबत वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरीक्षक अतुल मडके करीत आहेत.


**कर्जत नगरपरिषद, कर्जत**

**जाहीर निविदा सूचना**

जा.क्र.३९३/२०२१-२२ दिनांक : २५/०२/२०२२

कर्जत नगरपरिषदेस खालील काम करणे कामी महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत शाखा) यांचेकडील योग्य त्या वर्गात नोंदणीकृत व इतर नोंदणीकृत ठेकेदाराकडून बी-१ पद्धतीने निविदा मागवित आहे. ज्या ठेकेदारांना निविदा भरावयाच्या असतील त्यांनी कामाच्या समोर नमूद केलेली निविदा फॉर्मची किंमत नगरपरिषदेकडे भरणा करून निविदा फॉर्म प्रती घेऊन जाण्याची व्यवस्था करावी. कोऱ्या निविदा फॉर्म दिनांक २७/०२/२०२२ ते ०७/०३/२०२२ दु. १२.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस सोडून पुरविल्या जातील.

ठेकेदारांनी आपलेकडील सिलबंद निविदा दि. ०८/०३/२०२२ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद यांचे नावे सादर करावयात. प्राप्त निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ४.३० वा. उपस्थित निविदाधारकांसमोर उघडणेत येतील. कोणतेही कारण न देता एक अगर सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम (धनाकर्षाद्वारे) | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | कर्जत समाज मंदिरामध्ये नवीन वायरींग करणे. | १,८९,४५२/- | २०००/- | २००/- |

सही/-
(डॉ. पंकज पाटील)
मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद

सही/-
(सौ. सुवर्णा केतन जोशी)
अध्यक्ष
कर्जत नगरपरिषद



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Tender / RFX | Description | Esti. Cost. |
|---|---|---|
| Tend-36 **7000022365** | Work Supply and replacement of existing CT cable by 4CX2.5sq.mm Cu arm cables at 400kV R.S. Nagothane S/stn. | **Rs. 66.48 Lakhs** |
| Tend-38 **7000022354** | Strengthening/Rejuvenating of Existing Earthing system along with additional conventional Earth pits at 100 kV Ambernath & Dombivali sub-stations. | **Rs. 66.94 Lakhs** |

EMD 1% of estimated cost & Tender fee Rs. 500/- + GST. **Submission of bids from 25.02.2022 to 07.03.2022 up to 23:59 hrs., Opening date :- 08.03.2022.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer (Adm.) Tel. No. 9167026141

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

# आयपीएलचं बिगूल वाजलं!

## येत्या २६ मार्चपासून सामन्यांना सुरुवात



**मुंबई : वृत्तसेवा**

अखेर इंडियन प्रीमियर लीग २०२२ चं बिगूल वाजलंय. यंदाच्या आयपीएल सत्राला २६ मार्चपासून सुरुवात होणार आहे. गुरुवारी आयपीएल गव्हर्निंग काउंसिलची बैठक पार पडली. या बैठकीत यंदाच्या सत्रातील आयपीएल मॅचला येत्या २६ मार्चपासून सुरुवात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

गेल्या वर्षी जगासह भारतावर कोरोनाचे संकट होते. भारतात तर परिस्थिती अधिकच गंभीर बनली होती. त्यामुळे आयपीएलचे सामने भारताबाहेर झाले होते. मात्र यंदा सर्व सामने भारतातच होणार असून, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व काळजी घेऊन सामने आयोजित करण्यात येणार आहेत. यंदाच्या आयपीएलचे बुहता:श सामने हे पुणे आणि मुंबईतच खेळवले जाणार आहेत. मुंबईत ५५ तर पुण्यात १५ मॅच खेळवण्यात येणार आहेत.

यंदा आयपीएलचे ५५ सामने हे मुंबईत तर १५ सामने पुण्यात खेळवण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे. या सामन्यांपैकी २० सामने हे मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर, २० सामने डीवाय पाटील स्टेडियमवर तर सीसीआयमध्ये १५ सामने होणार आहेत. तर पुण्यात १५ सामने खेळवण्यात येणार असल्याची माहिती आयपीएल गव्हर्निंग काउंसीलच्या वतीने देण्यात आली आहे. आयपीएलच्या नियोजनासाठी पुन्हा एकदा आयपीएल गव्हर्निंग काउंसीलची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडणार असल्याची माहिती समोर येत आहे. यंदा अहमदाबाद आणि लखनऊ असे दोन नवीन संघ पहिल्यांदाच आयपीएलमध्ये खेळताना दिसणार आहेत.

दरम्यान, यंदाच्या आयपीएल सत्रात प्रेक्षकांना मैदानात जाऊन मॅच पाहाण्याची संधी मिळणार असल्याची चर्चा आहे, मात्र त्यासाठी शासनाने दिलेल्या कोरोनाविषयक सर्व नियमांचे पालन करणे आवश्यक असणार आहे.

### सहभागी संघ

१. दिल्ली कॅपिटल्स
२. चेन्नई सुपर किंग्ज
३. मुंबई इंडियन्स
४. रॉयल चॅलेंजर्स बंगलोर
५. कोलकाता नाईट रायडर्स
६. पंजाब किंग्ज
७. गुजरात टायटन्स
८. लखनऊ सुपर जायंट्स
९. सनरायझर्स हैदराबाद
१०. राजस्थान रॉयल्स

# भारताची श्रीलंकेविरुद्ध विजयी सलामी

## पहिल्या टी-२० सामन्यात दणदणीत विजय



**लखनऊ : वृत्तसंस्था**

डावखुरा यष्टीरक्षक-फलंदाज इशान किशन (५६ चेंडूंत ८९ धावा) आणि श्रेयस अय्यर (२८ चेंडूंत नाबाद ५७) यांच्या धडाकेबाज अर्धशतकांच्या बळावर भारताने गुरुवारी पहिल्या ट्वेन्टी-२० सामन्यात श्रीलंकेवर ६२ धावांनी विजय मिळवला.

भारताच्या २०० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेने २० षटकांत ६ बाद १३७ धावांपर्यंतच मजल मारली. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. श्रीलंकेने सुरुवातीपासून ठरावीक अंतराने गडी गमावले. त्यांच्या अव्वल सहा फलंदाजांपैकी डावखुऱ्या चरिथ असलंकाला (नाबाद ५३) भारतीय गोलंदाजांचा प्रतिकार करता आला. तत्पूर्वी भारताने २० षटकांत २ बाद १९९ अशी धावसंख्या उभारली.

भारताचे सलामीवीर किशन आणि कर्णधार रोहित शर्मा (४४) यांनी १११ धावांची सलामी दिल्यावर रोहितला लाहिरू कुमाराने बाद केले. यानंतर किशन आणि श्रेयस यांनी आक्रमक शैलीतील फलंदाजी सुरू ठेवली. किशनचे शतक हुकले. त्याने ५६ चेंडूंत १० चौकार आणि तीन षटकारांच्या साहाय्याने ८९ धावांची खेळी केली. तो बाद झाल्यावर श्रेयसने भारताला २०० धावांसमीप पोहचवले.

भारत : २० षटकांत २ बाद १९९ (इशान किशन ८९, श्रेयस अय्यर नाबाद ५७, रोहित शर्मा ४४; दसुन शनका १/१९) विजयी वि. श्रीलंका : २० षटकांत ६ बाद १३७ (चरिथ असलंका नाबाद ५३; भुवनेश्वर कुमार २/९, वेंकटेश अय्यर २/३६), सामनावीर : इशान किशन.

# गौरवास्पद! सिंगापूरमध्ये मीराबाई चानूची 'सुवर्णभरारी'



**सिंगापूर : वृत्तसंस्था**

भारताची स्टार वेटलिफ्टर मीराबाई चानू हिने शुक्रवारी ५५ किलो वजनी गटात सिंगापूर वेटलिफ्टिंग इंटरनॅशनलमध्ये सुवर्णपदक जिंकलं. या सुवर्णभरारीमुळे तिने २०२२ मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. ५५ किलो वजनी गटात प्रथमच सहभागी होताना चानूने १९१ किलो (८६ किलो + १०५ किलो) वजन उचलून सुवर्णपदक पटकावलं.

रौप्यपदक विजेती लिफ्टर ऑस्ट्रेलियाची जेसिका सेवास्टेन्को हिने सर्वोत्तम १६७ किलोची (७७ किलो + ९० किलो) उचल केली. पण तिच्यापेक्षा मीराबाईची उचल ही तब्बल २४ किलोंनी जास्त ठरली. मलेशियाच्या एली कॅसांड्रा एंगलबर्टने १६५ किलोची उचल (७५ किलो + ९० किलो) केली. तिला तिसऱ्या स्थानी कांस्यपदकावर समाधान मानावं लागलं.

डिसेंबरमध्ये जागतिक चॅम्पियनशिपमधून बाहेर पडल्यानंतर गेल्या वर्षी टोकियो ऑलिम्पिकमध्ये चानूने स्पर्धात्मक लढतींमध्ये पुनरागमन केलं होतं. त्यावेळी तिने ऑलिम्पिकमध्ये वेटलिफ्टिंगमध्ये भारताला पहिलं रौप्यपदक मिळवून देण्याचा इतिहास रचला होता. २७ वर्षीय मीराबाई चानूने तिच्या राष्ट्रकुल क्रमवारीच्या आधारे ४९ किलो वजनी गटात कॉमनवेल्थ गेम्ससाठीदेखील पात्रता मिळवली आहे, मात्र आजच्या पराक्रमानंतर तिला ५५ किलो वजनी गटासाठीही पात्रता मिळाली आहे.

# रवींद्र जडेजाची पुष्पा स्टाईल सोशल मीडियावर व्हायरल



**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाच्या खेळाडूंमध्ये पुष्पा सिनेमाचा फिव्हर कायम आहे. श्रीलंका विरुद्ध भारत पहिल्या टी२० सामन्यात पुन्हा एकदा तो पाहायला मिळाला. टीम इंडियाचा स्टार अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाने जवळपास २ महिन्यांच्या विश्रांतीनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शानदार पुनरागमन केले आहे. भारत आणि श्रीलंका यांच्यात सुरु झालेल्या ३ सामन्यांच्या टी२० मालिकेत रवींद्र जडेजाने आपल्या शानदार गोलंदाजीने आणि त्याच्या सेलिब्रेशनने भारतीय चाहत्यांची मने जिंकली आहेत.

या सामन्यात जडेजाने ४ ओव्हरमध्ये अत्यंत किफायतशीर गोलंदाजी करत १ विकेट घेतली. या विकेटनंतर त्याचा आनंद साजरा करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.


श्रीलंकेच्या डावातील १०व्या ओव्हरच्या दुसऱ्या बॉलवर रवींद्र जडेजाने श्रीलंकेचा अनुभवी फलंदाज दिनेश चंडीमलला १० धावांवर बाद केले. विकेट घेतल्यानंतर जडेजाने नंतर पुष्पा स्टाईलमध्ये मैं झुकेगा नहीं डायलॉगची सिग्नेचर ॲक्शन केली. जडेजाच्या वाढलेल्या दाढीच्या लूकमध्ये ही ॲक्शन त्याला खूप शोभत आहे, आता हा व्हिडिओ सोशल मीडियावरही व्हायरल होत आहे.

प्रदीर्घ काळानंतर दुखापतीतून बाहेर आल्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करणाऱ्या रवींद्र जडेजाला या सामन्यात फलंदाजीसाठी संधी मिळाली नाही. मात्र त्याने आपल्या गोलंदाजीत कर्णधार रोहित शर्माला निराश केले नाही. जडेजाने ४ ओव्हरमध्ये फक्त ७ च्या इकॉनॉमी रेटने २८ धावा दिल्या आणि १ विकेट घेतली.

टीम इंडियाने २०२२ मध्ये श्रीलंकेविरुद्ध ६२ धावांनी विजय मिळवला. दुसरीकडे, लखनऊच्या अटल विहारी वाजपेयी एकना क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात श्रीलंकेचा कर्णधार दासुन शनाकाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने अवघ्या २ विकेट गमवत १९९ धावा केल्या आणि श्रीलंकेला २०० धावांचे डोंगरासारखे लक्ष्य दिले.

प्रत्युत्तरात श्रीलंकेला निर्धारित २० षटकांत केवळ १३७ धावाच करता आल्या. त्यामुळे टीम इंडियाने पहिला सामना ६२ धावांनी जिंकला आहे. ३ सामन्यांच्या या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी घेतली आहे.

श्रीलंका विरुद्ध भारत पहिल्या टी२० सामन्यात पुन्हा एकदा पुष्पा सिनेमाचा फिव्हर पाहायला मिळाला. या वेळी रवींद्र जडेजाचा व्हिडिओ व्हायरल होत आहे.



# आयपीएलपूर्वी रोहित शर्माचा होणार सन्मान

**मुंबई :** रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ सध्या चांगली कामगिरी करत आहे. विराट कोहलीने कसोटी संघाच्या कर्णधारपदाचा राजीनामा दिल्यानंतर रोहित आता तिन्ही फॉरमॅटमध्ये टीम इंडियाचा कर्णधार आहे. श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत रोहित कर्णधार म्हणून मैदानात दिसणार आहे. क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये कर्णधारपदी नियुक्ती झाल्यानंतर मुंबई क्रिकेट असोसिएशनने 'हिटमॅन'चा सन्मान करण्याचा निर्णय घेतला आहे. रोहित मुंबईकडून देशांतर्गत क्रिकेट खेळतो.

पीटीआयने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी झालेल्या एमसीएच्या शिखर परिषदेच्या बैठकीत रोहितचा सन्मान करण्याचा निर्णय घेण्यात आला. परिषदेच्या एका सदस्याने सांगितले, आज सर्वोच्च परिषदेच्या बैठकीत रोहित शर्माला तिन्ही फॉरमॅटचा कर्णधार बनवल्याबद्दल त्याचा सत्कार करण्याचा निर्णय घेण्यात आला.








**पनवेल : न्हावा गोल्डन स्पोर्ट्स क्लबच्या वतीने न्हावा येथील गावदेवी मैदानावर क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. २३ ते २७ फेब्रुवारीदरम्यान ही स्पर्धा सुरू राहणार असून, या स्पर्धेला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. या वेळी न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, सदस्य सागरशेठ ठाकूर, माजी सरपंच चंद्रकांत भोईर, संजय ठाकूर, मोरेश्वर पाटील, मिनाक्षी पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शकुंतला रामशेठ ठाकूर यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या.**











**उलवे नोड : येथे स्थानिक प्रकल्पग्रस्त रिक्षा चालक मालक संघटनेच्या वतीने श्री सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन सेक्टर १७ मधील रिक्षा नाका येथे करण्यात आले होते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या कार्यक्रमाला भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, एन. सी. घरत, वामनशेठ म्हात्रे, अनंता ठाकूर, दामोदर भोईर, व्ही. के. ठाकूर, किशोर पाटील, गजानन घरत, आशिष घरत, सुधीर ठाकूर, कमलाकर घरत, राजू घरत, महिला मोर्चा उलवे नोड २ अध्यक्ष योगिता भगत, सुजाता पाटील, जयश्री घरत आदी उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शकुंतला रामशेठ ठाकूर यांच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com